# संपादकीय

### महेश एलकुंचवार यांना सरस्वती सन्मान पुरस्कार

प्रा. महेश एलकुंचवार यांना युगान्त या नाट्यत्रयीबद्दल यंदाचा पाच लाखांचा सरस्वती सन्मान के. के. बिर्ला फाऊंडेशनतर्फे प्रदान करण्यात येणार आहे. यापूर्वी १९९४ साली विजय तेंडुलकर यांच्या कन्यादान या नाटकाला सरस्वती पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्यानंतर मराठीला हा दुसऱ्यांदा मिळणारा पुरस्कार 'ज्ञानपीठ'प्रमाणेच अभिमानास्पद वाटावा यात आश्चर्य नाही. प्रा. एलकुंचवार यांचे आम्ही मन:पूर्वक अभिनंदन करतो.

प्रा. एलकुंचवार यांच्या रुद्रवर्षा या चाकोरीबाह्य नाटकाने १९६७ साली साहित्यरसिकांचे लक्ष वेधून घेतले. वास्तववादी पातळी आणि नियतीच्या अमानुषतेची पातळी - अशा दोन पातळ्यांवर घडणारे हे नाटक 'शापित' पात्रांच्या दु:खगर्भ आंतरिक संघर्षाचे आणि उद्ध्वस्ततेचे भेदक चित्र प्रेक्षकांसमोर उभे करते. दु:खव्यथावेदनेने ओतप्रोत भरलेल्या भूतकाळाचे सावट पडलेल्या या पात्रांचे मेलोड्रॅमॅटिक सूडनाट्य काहीसे भडक-अतिरंजित वाटले तरी प्रत्ययकारक, उत्कट भावदर्शक संवादामुळे एलकुंचवार यांच्या नाट्यप्रतिभेची झलक रसिकांना दिसली. गार्बो या नाटकातील लैंगिकता व हिंस्त्रता, शिवराळ भाषाशैली आणि प्रक्षोभक क्रौर्य यामुळे त्याचा गाजावाजा झाला. सभ्यतेचे, सात्त्विकतेचे मुखवटे दूर करून माणसाच्या आदिम प्रेरणांचे नग्न दर्शन घडवणारे आणि श्लील-अश्लील, नैतिक-अनैतिक यांच्या सीमारेषांची पर्वा न करणारे हे नाटक एलकुंचवारांचे स्थान पक्के करणारे ठरले. वासनाकांड हे त्यानंतरचे नाटक १९७५ साली रंगभूमीवर आले. त्यानेही सेन्सॉर बोर्डाचा रोष ओढवून घेतला. बहीण-भावाच्या अनैसर्गिक संबंधांवर उभारलेले हे नाटक कलावंताची कलानिर्मितीच्या संदर्भातील कामभावना आणि स्त्रीची स्त्रीसुलभ प्रकृतीच्या संदर्भातील निखळ कामवासना यांच्यातील पातळ्या स्पष्ट करतानाच या प्रमत्त कामवासनेच्या पलीकडे जाणारी अध्यात्मिकताही प्रकट करते-असे टीकाकारांनी म्हटले आहे. एक वैचारिक शिल्प, एक भौमितीय प्रमेय, प्रतीकात्मक नाट्याशय या दृष्टीनेही या नाटकाचा विचार केला गेला आहे. पार्टी (१९८१) मध्येही असाच खळबळजनक विषय एलकुंचवारांनी हाताळला आहे.

'वाडा चिरेबंदी' मध्ये एलकुंचवार यांनी आधीच्या नाटकांपेक्षा वेगळे वातावरण चितारले. क्रौर्य, हिंसा, लैंगिकता यापासून काहीसे दूर होऊन सरंजामी जीवनव्यवस्था, संयुक्त कुटुंब,संक्रमणावस्थेतील व नातेसंबंधातील ताणतणाव यांचा मागोवा घेतला. वाडा हा जिवंत, जागता, चालताबोलता, चढतापडता गतिमान इतिहास असतो; आणि वास्तुपुरुष म्हणून तोच या नाटकाचा नायक आहे, धरणगावकर देशपांडे कुटुंबाचा कल्पपुरुष आहे; सर्वजण त्या



कुलपुरुषापुढे नतमस्तक असतात, आपले सगळे अस्तित्व त्या कुलपुरुषाच्या ठायी विलीन करूनच जीवनक्रम चालवत असतात. या नाटकाबद्दल संगीत नाटक अकादमीने १९८९ मधील उत्कृष्ट नाटककार म्हणून एलकुंचवार यांचा गौरव केला. इंग्रजी (ओल्ड स्टोन मॅन्शन), बंगाली (उत्तराधिकार), हिंदी (विरासत) या भाषांत भाषांतरेही झाली. पुढे 'मग्न तळ्याकाठी' आणि युगान्त या दोन नाटकांची जोड देऊन ही नाट्यत्रयी पूर्ण केली गेली. 'युगान्त'ला यंदाचा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. आणि सरस्वती सन्मानने त्यावर कळस चढवला. १९८९ मध्ये 'आत्मकथा'या त्यांच्या नाटकानेही जाणकार प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

प्रा. एलकुंचवार यांच्या बहुतेक सर्व नाटकांचे इंग्रजी आणि हिंदी या भाषांत अनुवाद झालेले आहेत. आणि इंग्रजीतही त्यावर अनेक समीक्षात्मक लेख आलेले आहेत.

प्रा. एलकुंचवार यांनी गेली ३५ वर्षे मराठी रंगभूमीची निष्ठापूर्वक सेवा केली. इंग्रजीचे प्राध्यापक म्हणूनही आयुष्यभर काम केले. सरस्वती सन्मान हा पुरस्कार त्यांना वयाच्या ६३व्या वर्षी मिळाला. त्यासाठी त्यांची अमृतमहोत्सवाची किंवा सहस्त्रचंद्रदर्शनाची वाट बघावी लागली नाही. त्यामुळे पुढची दहावीस वर्षे एक सिलेब्रिटी म्हणून ते सभासंमेलनांमध्ये वावरत राहतील. नाट्यक्षेत्रात नवे चैतन्य ते आणू शकतील. असे उच्च पुरस्कार म्हणजे आपल्या कर्तृत्वाची अंतिम मजल वा अंतिम टप्पा असे अनेकांना वाटते. कारण असे उच्च पुरस्कार हे बहुतेकांना पंचाहत्तरीच्या आसपास मिळतात आणि त्यावेळी त्यांच्या देहाप्रमाणेच प्रतिभाही गलितगात्र झालेली असते. प्रा. एलकुंचवार यांना पासष्टीच्या आतच हा पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या प्रतिभेला आणखी बहर यावा अशीच रसिकांची अपेक्षा राहील. आजवर त्यांनी वेगवेगळी प्रयोगशील नाटके लिहून स्वत:ची वेगळी वाट चोखाळली. रसिकांनी त्यांच्या या वेगळेपणाला वेळोवेळी दादही दिली. यापुढे आणखी तसेच काही भव्यदिव्य त्यांच्या हातून घडावे हीच अपेक्षा.

### मंगेश पाडगावकर :
### आपल्या कविप्रतिमेशी व कविधर्माशी इमान राखणारा लोकप्रिय कवी

कविवर्य मंगेश पाडगावकर यांना 'कुसुमाग्रजांचा' जनस्थान पुरस्कार घोषित झाला याचा आनंद मराठी रसिकांना होणे स्वाभाविक आहे. 'त्रिवेणी' हा १९९५ साली प्रसिद्ध झालेला कवितासंग्रह पाडगावकरांनी कुसुमाग्रजांना अर्पण केला आहे. 'प्रिय कुसुमाग्रज, तुमच्या कवितेचा हात धरून माझी कविता चालायला शिकली' असे त्या अर्पण पत्रिकेत म्हटले आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेवर आपण वाढलो; त्यांची साथ घेऊन आपली कविता वाट चालत राहिली अशी कृतज्ञता पाडगावकरांनी व्यक्त केली आहे. परंतु त्यापुढे जाऊन असेही म्हणता येईल की साठोत्तरी काळात मराठी कवितेला रसिकांच्या मनात स्थानापन्न करणाऱ्या, काव्यदर्शनकार कविपरंपरेचा उशिरा का होईना गौरव करणारा हा पुरस्कार आहे; आणि त्याचबरोबर आपल्या कविधर्माला आयुष्यभर जागणाऱ्या एका मनस्वी कवीच्या अढळ काव्यनिष्ठेला महाराष्ट्राने दिलेली ही कृतज्ञ दाद आहे. विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर या तिघांनी १९६२ पासून काव्यदर्शन या संयुक्त कार्यक्रमाद्वारे केवळ स्वत:च्याच नव्हे तर केशवसुतांपासून

गोविंदाग्रज, बालकवी, राजकवी तांबे, बा. सी. मर्ढेकर, पु. शि. रेगे, बा.भ. बोरकर, इंदिरा संत, प्रभृतींच्या वेचक-वेधक कविता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचवल्या आणि 'रविकिरण मंडळा'च्या नंतर काहीशी खंडित झालेली कविता ऐकण्याची मराठी माणसाची सवय व आवड पुनरुज्जीवित केली.

सादरीकरणाचा एक प्रयोग म्हणून या त्रिमूर्तीने काव्यदर्शनाचा कार्यक्रम रेखीवपणे बसवला. नुसत्या आपल्या कविता ऐकवणे हा सीमित हेतू समोर न ठेवता, वेगवेगळ्या वाचनशैलींचे अनुसरण करीत, नाट्यपूर्ण ढंगात आकर्षक उत्कंठावर्धक संहितेचे सादरीकरण जाणीवपूर्वक तरीही काहीशा अनौपचारिकपणे रसिकवृंदाशी संवाद साधत करण्याचा हा प्रकार मराठी माणसाला आवडला. या काव्यदर्शनाला त्याचा चांगला प्रतिसाद मिळाला. काव्यवाचन ऐकण्यासाठी तिकीट काढायची तयारीही त्यामुळे तो दाखवू लागला; आणि काव्यदर्शनाचे कार्यक्रम आपापल्या गावी व्हावेत म्हणून कार्यकर्त्यांमध्ये चढाओढही सुरू झाली. काव्य वाचनासाठी मानधन ही कल्पनाही रूढ होऊ लागली आणि ती पुढे कथाकथनासाठी आणि व्याख्यानासाठी मानधन येथपर्यंत विस्तारण्यास वेळ लागला नाही. पूर्वी काव्यवाचन, व्याख्यान, सभासंमेलनातले सादरीकरण हा सर्व हौसेचा मामला असे. त्यासाठी क्वचितच कोणाला मानधन दिले जाई...आता मानधन गृहीत धरूनच निमंत्रण दिले-घेतले जाते. बापट-पाडगावकर प्रभृतींच्या सादरीकरणावर टीका करणारे वा त्यांची व्यासपीठीय कवी म्हणून संभावना करणारे लोकही मानधनाविना एक पाऊल पुढे टाकत नाहीत. व्यासपीठीय सादरीकरणाच्या कविता असा काही वेगळा प्रकार अस्तित्वात आला आहे असे नाही; परंतु सर्वसामान्य रसिकाची दाद मिळवणाऱ्या कविता कोणाही कवीच्या संग्रहात मोजक्याच असतात; आणि त्या कविता पुन:पुन्हा म्हणण्याची रसिकांचीही फर्माईश होत राहते; दुर्दैवाने काही चमचाभर प्रतिभेचे कवी आपल्या त्याच त्या कवितांचे चऱ्हाट वळत वर्षानुवर्षे कविसंमेलनात हजेरी लावत राहतात हे खरे आहे. परंतु बापट-पाडगावकर-करंदीकर यांनी काव्यलेखन विपुल केलेले आहे; त्यामुळे मोजक्या दोनचार कवितांवरच निभावून नेण्याची पाळी त्यांच्यावर कधीच आली नाही हेही 'व्यासपीठीय' काव्यावर टीका करणाऱ्यांनी लक्षात ठेवायला हवे. या तिघांच्या बाबतीत रसिकांचा अनुभव हा की 'किती म्हणू आणि किती नाही' असा या कवींचा उत्साह असतो; आणि आणखी एक, आणखी एक असा रसिकांचा आग्रह असतो.

**कवी म्हणून जपलेली आत्मप्रतिमा**

बापट-करंदीकर-पाडगावकर या तिघांचाच विचार केला तर काव्यसंग्रहांची संख्या सर्वात जास्त मंगेश पाडगावकरांच्या नावावर आहे; आणि लेखनातले सातत्यही पाडगावकरांनी मोठ्या तडफदारपणे टिकवलेले आहे हे मान्य करावेच लागते. एक कवी म्हणून स्वत:ची आत्मप्रतिमा शालेय वयापासूनच ते जपत-जोपासत राहिले. आणि काव्यलेखनापुढे त्यांनी कॉलेजशिक्षणही अर्ध्यावर सोडले. यशोदा पाडगावकरांनी आपल्या आत्मकथनात या मनस्वी कविमनाचे उद्रेक कसे पदोपदी प्रत्ययाला येत याचे त्यांच्या प्रणयाराधनेच्या आणि नंतरच्याही काळातले अनेक किस्से दिले आहेत.

कवी म्हणून जगायचे या मनोभावे केलेल्या प्रतिज्ञेमुळे आरंभीच्या काळात पाडगावकरांची



फार फरफट झाली; आणि पुढे पु. ल. देशपांडे यांच्या आग्रहामुळे आकाशवाणीवर नोकरी स्वीकारणे त्यांना मान्य करावे लागले. त्यानंतर अपुरे राहिलेले शिक्षण पूर्ण करून, एम. ए. होऊन प्राध्यापकपद व पुढे युसिसमध्ये मराठी विभागाचे संपादकपद - याद्वारे आपले कौटुंबिक उत्तरदायित्व त्यांनी निभावून नेले हे खरे, परंतु आपल्या कविधर्माला त्यांनी आयुष्यात सर्वोच्च स्थान दिले. प्रपंचात राहून नित्यनैमित्तिक जबाबदाऱ्या इतरांवर सोपवून आपल्या कवित्वाची साधना त्यांनी अविरत चालू ठेवली. त्याचमुळे अवघ्या २१ व्या वर्षी त्यांचा 'धारानृत्य'हा संग्रह प्रसिद्ध झाला; आणि त्या पाठोपाठ त्यांचे काव्यसंग्रह येत राहिले. जिप्सी (१९५३), छोरी (१९५७), उत्सव (१९६२), वात्रटिका (१९६४), मीरा (१९६५), विदूषक (१९६६), सलाम (१९७८), गझल (१९८१), भटके पक्षी (१९८८), तुझे गीत गाण्यासाठी (१९८९), बोलगाणी (१९९०), उदासबोध (१९९४), त्रिवेणी (१९९५), कबीर (१९९७), मोरू (१९९९), सूरदास (१९९९), कविता माणसांच्या, माणसासाठी (१९९९), राधा (२०००) - असे १९ संग्रह पाडगावकरांच्या नावावर आहेत. शिवाय बालगीतांचे आठ संग्रह; निंबोणीच्या झाडामागे हा ललितलेखसंग्रह, शेक्सपियरच्या नाटकांचे अनुवाद - पाडगावकर स्वत:ला सतत काव्यलेखनाच्या समाधीत गुंतवून ठेवत असतात; त्याचबरोबर ते पुस्तकांना प्रस्तावना लिहिणे, प्रकाशन समारंभांना हजर राहणे, या निमित्तानेही भरपूर भटकतात. अशा वेळी जे बोलायचे ते लेखी लिहून आणतात. त्यात त्या पुस्तकाचा सांगोपांग परामर्श घेतलेला असतो. अशा लेखी भाषणांचीही दहावीस पुस्तके पुढे निघाली तर आश्चर्य वाटू नये.

**सर्वाधिक लोकप्रिय कवी**

त्याचबरोबर पाडगावकरांच्या बहुतेक काव्यसंग्रहांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघाल्या आहेत हेही नमूद करायला हवे. जिप्सीच्या १९५३ नंतर दहा आवृत्त्या निघाल्या आहेत. बोलगाणी (७ आवृत्त्या), सलाम, उदासबोध, तुझे गीत गाण्यासाठी (चार चार आवृत्त्या)...विदूषक, गझल, मीरा (तीन तीन आवृत्त्या)- दुसऱ्या कोणा कवीचे एकतर इतके संग्रह निघालेले नाहीत; आणि आवृत्त्यांच्या बाबतीत तर पाडगावकरांचाच विक्रम रेकॉर्डब्रेक मानावा लागेल. पाडगावकर हे या निकषावर सर्वाधिक लोकप्रिय कवी ठरू शकतील असे वाटते. जिप्सी, सलाम, प्रेम म्हणजे प्रेम असते,शुक्रतारा यासारख्या कविता आणि काही भावगीते-लोकांच्या ओठावर सतत असतात.

मंगेश पाडगावकरांच्या कवितेचा मुख्य प्रवाह हा रोमँटिक भावकवितेची परंपरा जपणारा आहे. दिलीप पुरुषोत्तम चित्रे वगैरे साठोत्तरी काळातले कवी या रोमँटिसिझमच्या मागे ॲडोलसंट हे विशेषण आवर्जून लावत असतात. कवितेची रूढ परिभाषा व प्रतिमा वापरणे, प्रेम शृंगार यावर रसिकसापेक्ष कविता लिहिणे, क्लृप्त्यांची चतुर योजना करणे, धक्कादायक शेवट करणे, विशिष्ट खटके व चाली चपखलपणे वापरणे, वगैरे लक्षणे या प्रकारच्या कवींमध्ये दिसतात. बोरकर, तांबे, कुसुमाग्रज यांचा पाडगावकरांवर प्रभाव आहेच.

'जिप्सी' च्या रूपाने त्यांनी पन्नास-पंचावन्नच्या काळात तरुणांपुढे एक स्वच्छंद मुक्त जीवनाची अनावर उर्मी निर्माण केली. 'नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे' असे म्हणणारा केशवसुतांचा नवा शिपाई, गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार असे


म्हणणारा कुसुमाग्रजांचा लढाऊ क्रांतिकारक, याच पठडीतला कालोचित युगस्वर पाडगावकरांच्या जिप्सीतून तत्कालीन ॲलिनिएटेड, आऊटसायडर पण आनंदासक्त तरुणवर्गाची मानसिकता पकडणारा ठरला.

घर असूनही आता घर उरलेले नाही
चार भिंतीची जिप्सीला ओढ राहिलेली नाही...
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून

यासारख्या ओळींनी त्या वेळच्या तरुणांना विशाल जगाची अफाट क्षितिजे खुणावू लागली. तरुणवर्गाला पाडगावकरांची ही कविता आपली आत्मसखी वाटू लागली. ती भावना स्वप्नाळू होती, पण आकर्षक व्यापक सामाजिक बांधिलकीचे भान देणारीही होती. आत्मसाफल्याची ओढ व्यक्त करणारी होती. प्रेमाची हुरहूर, मीलनाची तृप्ती, तृप्तीतील वेदना वगैरे प्रेमभावनेच्या तरल छटा टिपणारी होती. या माझ्या पंखांनी उडण्याचे वेड दिले, पण माझ्या हातांनी घरटे हे निर्मियले - ही कुचंबणा व घुसमटही त्या कवितेत होती. ती तरुणमनाला भावणारी होती.

एक कवी म्हणून पाडगावकर यांनी आपली विशुद्ध काव्यउर्मी जपतानाच, मीरा, सूरदास, कबीर वगैरेंशी असलेले आपले कविकुळाचे नातेही आत्मीयतेने जोपासले. मीरेच्या गीतांचा अनुवाद त्यांनी साठनंतर केला; त्याचा संग्रह १९६५ मध्ये निघाला. नंतर सूरदास, कबीर बऱ्याच वर्षांनी सिद्ध झाले. काव्यलेखनातील सातत्य टिकवण्यासाठी पाडगावकर हे सतत जागरूक राहिले, आणि एखादी कल्पना सुचल्यावर ती पूर्ण ताकदीनिशी राबवण्यात त्यांनी कधी कुचराई केली नाही. 'वात्रटिका' लिहिण्याचे मनात आल्यावर चार दोन वात्रटिका लिहून ते थांबले नाहीत. एक संपूर्ण संग्रह होईल एवढ्या नेटाने त्यांनी तो किल्ला लढवला. 'बोलगाणी', उदासबोध, मोरू, वगैरे त्यांच्या संग्रहातही हा चिवटपणा दिसतो. त्यात काव्याची विशुद्ध उर्मी कमी, आणि एखाद्या विशिष्ट आशयबंधाचे व आकृतिबंधाचे आकर्षण अधिक दिसते. ते त्यांच्या काही चाहत्यांना खटकते; परंतु त्या बाबत आपण काही तडजोड केल्याचे पाडगावकर स्पष्ट नाकारतात. आपल्या प्रतिभेचाच तो अटळ आविष्कार मानतात.

- काहीही असो, आपल्या स्वयंनिर्धारित कविप्रतिमेला व कविधर्माला पाडगावकर हे गेली पन्नासावर वर्षे अखंडपणे जपत-जोपासत आले आहेत; आणि जनस्थान सारख्या पुरस्काराने या त्यांच्या प्रतिमेवर मानाचा तुरा खोवला आहे.






# त्रिवेणी

गुलजार, शान्ताबाई शेळके आणि कविता यांचा एक सुंदर त्रिवेणी संगम...

**मूळ लेखक : गुलजार**
**अनु. : शान्ता ज. शेळके**
**किंमत : ६०रु.**




## साहित्यवार्ता

### तुकोबांच्या जयघोषात खास नाण्याचे प्रकाशन

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा जयजयकार आणि अभंगवाणीच्या भक्तिभावपूर्ण वातावरणात पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते तुकाराम महाराजांची प्रतिमा असलेल्या नाण्याचे प्रकाशन दिल्ली येथे झाले. या समारंभामुळे विज्ञान भवनात जणू पंढरीच अवतरली होती. अवजड उद्योग खात्याचे मंत्री बाळासाहेब विखे पाटील यांनी संत तुकारामांची प्रतिमा असलेल्या शंभर, पन्नास, दहा आणि दोन रुपये किमतीच्या नाण्यांचा संच पंतप्रधानांना दिला. पंतप्रधानांनी तो संच उपस्थितांना दाखवताच 'श्री तुकाराम महाराज की जय' 'जय जय रामकृष्ण हरी'च्या घोषणा सभागृहात दुमदुमल्या आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. खास या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून आलेल्या वारकऱ्यांचे आणि भक्तांचे चेहरे आनंदाने फुलले. विजय भटकर यांनी संत तुकारामांचे जीवन व साहित्य यावर तयार केलेल्या सीडीचेही या वेळी पंतप्रधानांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

समाजाला संघटित राखण्यासाठी; तसेच संकटकाळात जनतेने धैर्य गमावू नये यासाठी संतांनी भक्तिरसाच्या माध्यमातून दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचा पंतप्रधान वाजपेयी यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. अशा संतमहात्म्यांच्या बळावर आपली संस्कृती चालली आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, ''संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर व समर्थ रामदास अशा अनेक संतांच्या भक्तिरसात जात, धर्म असा कोणताही भेदभाव नव्हता. वेद उपनिषद आणि भगवद्‌गीतेला लोकांच्या भाषेत संगीतबद्ध करून संतांनी भक्तीचा असा काही रस निर्माण केला, की त्यामुळे आक्रमणाचा प्रतिकार करण्याचीच नव्हे, तर स्वराज्य स्थापनेचीही प्रेरणा मिळाली. भक्तीबरोबरच शक्तीचे महत्त्वही त्यांनी पटवून दिले.''

या वेळी पंतप्रधान वाजपेयी यांनी मराठीतून श्रोत्यांशी संवाद साधला. ते म्हणाले, ''मऊ मेणाहूनी राहण्याची शिकवण देणाऱ्या संत तुकाराम महाराजांनी 'दुर्जनांच्या माथी हाणू काठी' असे म्हणून, शत्रूचा आणि दहशतवाद्यांच्या संकटाचा सामना करण्याचीही शिकवण दिली.'' पंतप्रधानांच्या या वाक्याला उपस्थितांनी टाळ्या वाजवून दाद दिली. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरें' या अभंगातून इतर मानव समाजाबरोबरच निसर्ग आणि समस्त प्राणिमात्रांबरोबर आत्मीयता व ममत्वाचा भाव राखण्याची तुकाराम महाराजांनी दिलेली शिकवण आजच्या काळातही तितकीच आवश्यक आहे.''

देशाची संस्कृती जिवंत आणि सळसळती राखण्यात संत आणि संतपरंपरेचा मोठा वाटा असल्याचा उल्लेख पर्यटन व सांस्कृतिकमंत्री जगमोहन, अर्थमंत्री जसवंतसिंह आणि अवजड उद्योगमंत्री बाळासाहेब विखे-पाटील या तिघाही मंत्र्यांनी केला.

जसवंतसिंह म्हणाले, ''संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, रामदास आणि एकनाथ महाराज या पाच संतांची शिकवण म्हणजे राष्ट्रचेतनेचा स्रोत आहे.''

वारकऱ्यांना पंढरपूरची वारी सुखाची व आरोग्यदायक व्हावी या दृष्टीने पंढरपूर आणि चंद्रभागा नदी परिसराची स्वच्छता आणि पंढरपूरचा तिर्थयात्रा पर्यटन स्थळाच्या रूपात विकास करण्याची योजना लवकरच सादर करण्याचे आश्वासन पर्यटनमंत्री जगमोहन यांनी दिले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी, पंतप्रधान वाजपेयी समारंभस्थळी येताच उपस्थितांनी 'संत तुकाराम महाराज की जय,' 'जय जय रामकृष्ण हरी'च्या घोषात त्यांचे टाळ्या वाजवून अभिवादन केले. श्री. विखे-पाटील यांनी शाल आणि पगडी देऊन पंतप्रधानांचे स्वागत केले. सुरेश वाडकर यांनी सहकलाकारांबरोबर 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी,' व 'जय जय रामकृष्ण हरी' हे अभंग सादर केले. श्री. वाडकर यांनी स्वत: 'भेटी लागे जीवा' हा अभंग सादर केला. व्यासपीठावर पंतप्रधान, अन्य केंद्रीय मंत्र्यांबरोबरच प्रा. सदानंद मोरे उपस्थित होते.

केंद्रीय पेट्रोलियम मंत्री राम नाईक, जहाजबांधणी राज्यमंत्री दिलीप गांधी, अर्थ राज्यमंत्री आनंदराव अडसूळ, खासदार प्रदीप रावत, चंद्रकांत खैरे व मोहन रावले, राज्याचे सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर, आमदार उल्हास पवार, पंढरपूरचे आमदार सुधाकर परिचारक, डॉ. भटकर, डॉ. वि. द. कराड; तसेच तनपुरे महाराज, कैकाडी महाराज, मोरे महाराज यांच्यासह पुणे, नगर, देहू, शिर्डी, सोलापूर आदी ठिकाणांहून आलेले सुमारे तीनशे वारकरी आणि आमंत्रित उपस्थित होते.

## विश्वकोशनिर्मिती मंडळाचा रा. ग. जाधव यांचा राजीनामा

महाराष्ट्र राज्य विश्वकोशनिर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. भविष्यात हे पद आपण पुन्हा स्वीकारणार नसल्याचेही त्यांनी राजीनामा पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे.

''माझा राजीनामा ही औपचारिक, प्रशासकीय आणि तांत्रिक मुद्द्यावरून निर्माण झालेली बाब आहे. हा बातमीचा विषय अजिबात नाही. मंडळाचे माजी अध्यक्ष मे. पुं. रेगे यांचे २८ डिसेंबर २००० ला निधन झाले. शासकीय अध्यादेशानुसार त्यांच्या जागी जानेवारी २००१ ला माझी नियुक्ती झाली. ही मुदत येत्या डिसेंबरमध्ये संपत होती; परंतु मंडळाच्या सदस्यांची मुदत मात्र ११ फेब्रुवारीला संपली. मंडळाच्या नव्या फेररचनेत अध्यक्ष आणि सदस्य एकाच वेळी अस्तित्वात यावेत, असा प्रघात आहे. ही फेररचना करणे सरकारला सोयीचे आणि सुकर जावे म्हणून मी पदाचा राजीनामा दिला आहे. मंडळाच्या पुनर्रचनेत माझी फेरनेमणूक मात्र मला स्वीकारता येणार नाही, हे मी नम्रपणे नमूद करतो. गेली दोन वर्षे अध्यक्षपद सांभाळण्याची जबाबदारी राज्य शासनाने माझ्यावर सोपविल्याबद्दल मी राज्य शासनाचा आभारी आहे.''

राजीनामा देताना माझा कोणावरही राग, द्वेषाची भावना नाही, असे सांगून ते म्हणाले, ''विश्वकोशाचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या जिद्दीने मी येथे आलो होतो; पण ते जमले नाही. हे काम बुद्धीला चालना देणारे आहे. त्यासाठी मानसिक प्रसन्नता आवश्यक असते; पण मला व्यक्तिश: हे शक्य झाले नाही. मी नसलो तरीही विश्वकोशाचे काम चालूच राहील.''

## पुराभिलेख विभागातील कागदपत्रांची इंग्रजी सूची प्रसिद्ध

महाराष्ट्र सरकारच्या पुराभिलेख विभागातील कागदपत्रांच्या खजिन्यात असलेले ऐतिहासिक महत्त्वाचे अभिलेख अभ्यासूंना कळण्यासाठी या विभागाने सूची मालिका प्रसिद्ध केल्या आहेत.



१८५२ ते १९२० या कालावधीतील अशा कागदपत्रांची ताजी इंग्रजी सूची प्रकाशित करण्यात आली आहे.

मुंबई, पुणे व खडकी शहरांच्या पाणी पुरवठ्यासाठी ब्रिटिश सरकारने १८५४ व १८६६ मध्ये आखलेल्या योजनांचे आराखडे; तसेच पोलिस खात्यासंबंधीची १८५३ मधील कागदपत्रे यांचा या सूचीमध्ये समावेश आहे. राज्यात सध्या दुष्काळी परिस्थिती आहे. १८७९ मध्ये ब्रिटिश सरकारने दुष्काळाच्या खाईतील शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कायदा केला होता. त्या संदर्भातील ८ एप्रिल १८७७ ते २४ मार्च १८८० या कालावधीतील कागदपत्रे आजही आजच्या प्रशासनालाही उपयुक्त ठरतील.

पुराभिलेख विभागाने १८५० पासून अशी ५६० जंत्री प्रकाशने प्रसिद्ध केली आहेत. पुराभिलेख विभागाची कार्यालये मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथे आहेत. ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेपासूनची कागदपत्रे या विभागात आहेत. १८२१ मध्ये या विभागाची स्थापना झाली. १६३० ते १९९६ पर्यंतचे शासकीय व खासगी अभिलेख मुंबईच्या पुराभिलेख विभागात उपलब्ध आहेत. १९७८ पासून दर वर्षी या विभागातर्फे ऐतिहासिक कागदपत्रांची प्रदर्शने आयोजित केली जातात. या विभागाकडे असलेल्या २६ लाख अभिलेखांची पृष्ठसंख्या अंदाजे ३९ कोटी आहे, असे संचालक भास्कर घाटावकर यांनी सांगितले.

पुराभिलेख विभागाने या वर्षी मुंबईत ३० जानेवारी ते ५ फेब्रुवारीपर्यंत राज्य मराठी विकास संस्थेच्या सहकार्याने राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर व नेताजी सुभाषचंद्र बोस या चार मान्यवर नेत्यांवरील ऐतिहासिक कागदपत्रांचे प्रदर्शन आयोजित केले होते.

ऐतिहासिक अभिलेख दीर्घकाळ टिकावेत म्हणून पुराभिलेख विभागात बांधणी व दुरुस्ती शाखा, मायक्रोफिल्मिंग आणि संगणक शाखा कार्यरत आहेत. स्कॅन झालेल्या अभिलेखांचे त्याच वेळेस ऑनलाईन पद्धतीने सूचीकरण करण्याचे कामही सुरू आहे.

सर्व अभिलेखागारातील १९५८ पर्यंतची हस्तलिखिते अभिलेख इतिहास संशोधकांना त्यांच्या संशोधनासाठी संशोधकीय नियमानुसार उपलब्ध करून दिली जातात. वृत्तपत्रे, राजपत्रे (गॅझेट) इत्यादी छापील अभिलेखांच्या प्रमाणित प्रती सर्वसामान्य जनतेला शासकीय अल्पदरात पुरविण्यासाठी मात्र कालावधीचे बंधन नाही.

## वाचन हा माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग -

'वाचन हा माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग असून माझ्याकडील जवळपास आठ हजार पुस्तकांचा संग्रह हीच माझी खरी संपत्ती आहे,' हे उद्‌गार कुणा साहित्यिकाचे नाहीत, तर ते आहेत आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभिनयाने हिंदी चित्रपटसृष्टीत स्वत:चा आगळा ठसा उमटवणाऱ्या अनुपम खेर यांचे.

पल्लवी गुप्ता यांच्या 'व्हेन दी पॉरिज ओव्हरफ्लोज' या इंग्रजी कथासंग्रहाचे प्रकाशन खेर यांच्या हस्ते क्रॉसवर्ड येथे करण्यात आले. आठवीत असतानाच वाचनाची गोडी लागल्याचे सांगून खेर म्हणाले की, माझ्या काकांनी त्यावेळी मॅक्झिम गॉर्कीचे 'मदर' हे पुस्तक भेट दिले व तेव्हापासूनच माझे पुस्तकांशी नाते जुळले.

रशियन साहित्याचे विशेषत: आत्मचरित्रांचे वाचन करणे आपल्याला अधिक आवडते. आयुष्यात वाचलेले पहिले पुस्तक हे रशियन आत्मचरित्रच असल्याने कदाचित त्या प्रकारची

आवड निर्माण झाली असेल. प्रत्येक जण हा उमेदवारीच्या काळातून कधी ना कधी जात असतो व या काळात त्याला प्रोत्साहनाची गरज असते. त्या दृष्टीनेच स्वत:च्या आयुष्यातील काही घटनांचा मागोवा घेणारा एकपात्री कार्यक्रम बसवत असून कलावंत म्हणून झालेली आपली जडणघडण रेखाटण्याचा प्रयत्न त्यात केला आहे. आयुष्यात अपयश हे अपरिहार्य असून अपयशातून आपण बऱ्याच गोष्टी शिकत असतो. माझ्या आयुष्यात तर प्रारंभी असे अपयशाचे प्रसंग बरेच आले. त्या प्रसंगांमुळे माझे अवघे आयुष्य बदलले व जगायचे कसे हे शिकता आले. म्हणूनच या एकपात्री प्रयोगाचे नांव 'कुछ भी हो सकता है' असे ठेवले आहे, असेही खेर म्हणाले.

## पाचवे विद्रोही साहित्य संमेलन

पाचव्या विद्रोही साहित्य-संस्कृती संमेलनाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्रोही नगरीत साने गुरुजी विचार मंचावर झाले. त्यावेळी डॉ. इलय्या म्हणाले, संस्कृत ही केवळ ब्राह्मणांची भाषा आहे, संपूर्ण देशाची नव्हे. या देशाची भाषा म्हणून इंग्रजी आणि अन्य प्रादेशिक भाषांना स्थान मिळावे. विद्रोही देशवासियांनी आता पात्र, बैलगाडीचे चाक आणि म्हैस (राष्ट्रीय प्राणी) ही प्रतीके वापरावीत. मी धनगर समाजातील असूनही हिंदू नाही, कारण हे हिंदुत्वच मला मान्य नाही.

लहान मुले आणि मोठ्यांसाठी मराठीचे शब्दकोष तयार करून स्वस्त किमतीत त्यांची विक्री करावी, अशी सूचना संमेलनाचे अध्यक्ष राजन खान यांनी केली.

डॉ. भारत पाटणकर आणि नगराध्यक्ष दीपक केसरकर यांनी डॉ. इलय्या यांचे भाषण गांभीर्याने घेऊ नये असे आवाहन केले. यावेळी क्रांतीवीर नागनाथ नायकवडी डॉ. बाबा आढाव, माजी न्या. बी. जी. कोळसे-पाटील, जयंत पवार आ. गुरुनाथ कुलकर्णी आदींनी विचार मांडले.

## गजल 'सहज' असावी; तंत्राचे 'भूत' मानगुटीवरून उतरवा

'इनका कहा ये आप समझे या खुदा समझे,' अशा मराठीतील दुर्बोध नवकवितांमधील गद्य चौकट मांडून कवितांना आणि कवींनाही व्यापक दृष्टी देण्याचे काम गजलने केले, असे मत दुसऱ्या अखिल भारतीय मराठी गजल संमेलनात प्रकट झाले.

अमृतराय मोरोपंतांपासून सुरू झालेला मराठी गजलांचा प्रवास, त्यातील टप्पे आणि त्याचा मराठी साहित्याशी, तसेच कवितांशी असणारा संबंध यावर परिसंवादात चर्चा करण्यात आली. मराठी गजल केवळ 'इश्किया गजल' नाही, ती सामाजिक भान राखणारी एक संवेदनशील मांडणी आहे, असे मत डॉ. राम पंडित यांनी व्यक्त केले. मराठी गजलांनी समीक्षक आणि समर्थक निर्माण केले. मराठीपण जपत कवितांना एक नवा ढाचा दिला, श्रीकृष्ण राऊत यांनी शब्दांच्या लयबद्ध बांधणीवर भर देत गजल म्हणजे मराठी साहित्याला मिळालेले वरदान आहे, असे स्पष्ट केले. गजलकाराला गानसुलभता आणि सहज रचना यांचे भान हवे त्यासाठी उर्दूबरोबर मराठी गजलांचाही सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे, असे सांगितले. 'मराठी गजलेबद्दल माझे मत' ही खास रसिकांसाठी आयोजित करण्यात आलेली खुली चर्चा रसिकांपेक्षा प्रस्थापित गजलकारांनीच जास्त रंगवली. 'एक जंगल है तेरी आखोमे, मै जहा भूल जाता हूँ' अशा तरल आणि मनावर अलगद उतरणाऱ्या गजलमध्ये तंत्रशुद्धता हवी अगर नको या विषयावर उलटसुलट चर्चा झाली.



तसेच गजलातील मूळ वाङ्मयीन गुणवत्ता, कवी म्हणून निरनिराळे फॉर्म हाताळण्याची गरज, ती 'रचणे आणि सुचणे' यातील फरक, त्यातील नाट्यमयता, मूलभूत लय, धूसरता, दुर्बोधता, सहजता अशा निरनिराळ्या मुद्द्यांवर एकमेकांचे मुद्दे खोडत, आरोप-प्रत्यारोप करत गजलकारांनी आपापली मते मांडली. मराठी साहित्यिक इतर भाषांतील साहित्य वाचतात का, त्यांचे सामाजिक भान हरपले आहे का, असे कळीचे प्रश्नही विचारण्यात आले.

हृदयाच्या स्पंदनांची लय बिघडली तर जीव गुदमरतो त्याचप्रमाणे तंत्राला बाजूला सारले तर गजलांची घडी विस्कळीत होते. प्रकाशाचे झाड दाखवणाऱ्या गजलाचा प्राण म्हणजे त्याचे तंत्र! त्यामुळे तंत्राचे भूत मानगुटीवर बसू न देता ते नैसर्गिकरीत्या आत्मसात करूनच गजल लिहिली गेली पाहिजे, या मुद्द्यांवर कमी-अधिक प्रमाणात एकमत होत चर्चेची सांगता झाली. मुक्तांगणचे अध्यक्ष डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी समारोप केला, तर सूत्रसंचालन किशोर पाठक यांनी केले.

या चर्चेत रमण रणदिवे, इलाही जमादार, दीपक जैन, संगीता जोशी, उत्तम कोळगावकर, बळवंत जेरूरकर, डी. एन. गांगण, अभिजित जोशी, हेमंत जाधव, कुबेर, चेतन पणेर यांनी भाग घेतला. समारोप सोहळा डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी आणि माजी विधानसभा अध्यक्ष मधुकरराव चौधरी यांच्या उपस्थितीत झाला. त्यानंतर गजलनवाज भीमराव पांचाळे यांनी मैफल सादर केली.

## साहित्य संमेलन म्हातारे झाले : विश्वास पाटील

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आता म्हातारे झाले आहे. या संमेलनांचा अध्यक्ष हा म्हाताराच असतो. म्हातारपणी अध्यक्षपद बरे दिसत नाही. मराठी संस्कृतीची पालखी पुढे नेण्यासाठी तरुणांना वाव दिला पाहिजे, असे प्रतिपादन 'पानिपत'कार विश्वास पाटील यांनी केले.

बेळगाव तालुक्यातील कडोली येथे १८ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून विश्वास पाटील म्हणाले, मराठी भाषा जगणार आहे. ती चिरंजीव आहे. अजरामर आहे. जगातील दहा कोटी लोक ही भाषा बोलतात. जगातील प्रमुख दहा भाषांमध्ये मराठीचा क्रमांक आहे. त्यामुळे मराठी भाषेचे काय होणार, ही ओरड अकारण आहे. इंग्रजी भाषेचे आक्रमण मराठी भाषेवर व अन्य भाषांवर होत आहे, ही तक्रारही उगाच आहे. मातृभाषा ही मातृभाषाच आहे. इंग्रजी भाषेत जगातील सर्व ज्ञानभांडार आहे. त्यामुळे आपणाला इंग्रजी भाषा शिकणे आवश्यक आहे. मराठी भाषा 'माता' तर इंग्रजी ही 'मावशी' आहे. म्हणून आपण तिला जवळ केले पाहिजे. मातृभाषेप्रमाणेच इंग्रजी भाषेवरही प्रेम करायला शिकले पाहिजे.''

आपल्या साहित्याबद्दल बोलताना ते म्हणाले, लहानपणी तमाशा पाहून माझ्या लेखनाची सुरुवात झाली. रामायण, महाभारत वाचून-ऐकून मनावर त्याचा ठसा उमटला. मराठी भाषा टाळ आणि चाळ यातून जाते. 'पानिपत'कार ही बिरुदावली मला लाभली; पण 'पानिपत' आणि 'महानायक' हे माझ्या जीवनातील अपघातच आहेत.''

## गुराखी साहित्य संमेलनाची शासनाकडून उपेक्षा : पाटील

''धर्म व जातीपातीची बंधने झुगारून स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करणाऱ्या जागतिक गुराखी साहित्य संमेलनाची अकरा वर्षापासून शासनाने उपेक्षा केली आहे. याउलट सामाजिक आस्था असलेल्या व लोकसंस्कृती संवर्धन करणाऱ्या जाणकारांनी आर्थिक मदत देऊन गौरव

केला,'' असे मत रायगडचे आमदार जयंत पाटील यांनी व्यक्त केले.

गुराखी साहित्य संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून ते म्हणाले, ''गुराखी साहित्य संमेलनासाठी शासनाने आर्थिक मदत करावी, असा सतत टाहो फोडला. मात्र, याकडे लोकप्रतिनिधींनी कानाडोळा केला. याउलट अखिल भारतीय साहित्य संमेलनासाठी शासन २५ लाख रुपये साभार देते. गुराखी संमेलनाला मात्र अद्याप मदत केली नाही.''

या वेळी डॉ. केशवराव धोंडगे यांना केंद्रीय पातळीवरचा राष्ट्रीय विकासरत्न हा पुरस्कार जयंत पाटील यांच्या हस्ते देण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन उपकर योजनेतून एक हजार २४० गुराख्यांना सदतीस हजार दोनशे रुपयांचा निधी देण्यात आला.

गुराखी साहित्य संमेलनात उपेक्षित भटक्या समाजाबरोबर गुराख्यांच्या व्यथा अकरा वर्षांपासून सातत्याने मांडल्या आहेत. शासकीय स्तरावर मात्र या संमेलनाची घोर निराशा केली जाते, अशी खंत संमेलनाचे संयोजक डॉ. केशवराव धोंडगे यांनी व्यक्त केली.

## 'मानवी मन सुसंस्कृत करणे हाच साहित्याचा हेतू'

''मानवी मनाची मशागत करून ते सुसंस्कृत करणे हाच साहित्याचा हेतू आहे. प्रा. व. बा. बोधे यांच्या रानपालखी या आत्मचरित्रा द्वारे हा हेतू साध्य झाला आहे,'' असे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांनी सांगितले.

'रानपालखी'चे प्रकाशन प्रा. शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते झाले. महापौर दीप्ती चौधरी, उद्योजक बी. जी. शिर्के, प्रा. वसंत वाघ, ज्येष्ठ पत्रकार वसंतराव काणे, डॉ. यशवंत पाटणे, प्रदीप पाटील आदी उपस्थित होते.

अस्सल ग्रामीण जीवनाचे दर्शन 'रानपालखी'तून होते. समाज बदलण्यास तयार नाही, याचे दुःखही त्यात व्यक्त झाले आहे, बोधे यांनी तटस्थपणे जीवनातील घटनांकडे पाहिल्याने त्यांचे आत्मचरित्र परिपूर्ण झाले आहे, असे मिरासदार म्हणाले.

दूरचित्रवाणीवरील विविध कार्यक्रमांमुळे वाचनसंस्कृती कमी होत आहे. साहित्याच्या भवितव्याच्या दृष्टीने ही चिंतेची बाब आहे, असे ही प्राचार्य भोसले यांनी सांगितले.

## अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी येरवड्यात धरणे

अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक येरवड्यातील आरक्षित जागेतच व्हावे, या मागणीसाठी मातंग समाजातर्फे ९ फेब्रुवारीला धरणे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनाचे नेतृत्व भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस संतोष राजगुरू यांनी केले. गुंजन टॉकीजजवळ स्मारकासाठी आरक्षित केलेली जागा इतर कुठल्याही संस्थेला देऊ नये, अशी मागणी या वेळी करण्यात आली. आरक्षणात बदल झाला तर रास्ता रोको करण्याचा इशारा राजगुरू यांनी दिला. आंदोलनात परिसरातील मातंग समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन उभारण्याचा निर्णयही परिसरातील मंडळांनी घेतला.

या स्मारकासाठी सुदाम लोखंडे नगरसेवक असताना गुंजन टॉकीजजवळ जागा आरक्षित करण्यात आली होती. मात्र, महापालिकेने ही तीन एकरांची जागा समाजाला विचारात न घेता परस्पर सिम्बायोसिस संस्थेला देऊन टाकली. त्यामुळे समाजावर अन्याय झाल्याची टीका या वेळी करण्यात आली.



## भारूड, पोवाडा, लोकगीतांतून जलसंवर्धन प्रचार मोहीम

केंद्र सरकार, राज्य सरकार व नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने आयोजित जलसंवर्धन प्रचार दिंडीला नांदेड जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळाला.

जलसंवर्धनाच्या प्रचारासाठी विद्यापीठाने जिल्ह्यात चार दिंड्या काढल्या. पहिली दिंडी किनवट येथून एक फेब्रुवारीला निघाली. किनवट, सारखणी, वाई, माहूर, हदगाव, भोकर, बारडमार्गे ही दिंडी नांदेड येथे दाखल झाल्यानंतर विद्यापीठ परिसरात दिंडीचे कुलगुरू डॉ. शेषराव सूर्यवंशी यांनी स्वागत केले.

दिंडीत जलसंवर्धनावर आधारित पथनाट्य, भारुडे, गौळण, पोवाडे व लोकगीते सादर केली जात आहेत. कुलगुरू डॉ. सूर्यवंशी, कुलसचिव डॉ. एस. एम. सोनवणे, कार्यक्रम समन्वयक प्रा. आंबेकर आदींनी शुभेच्छा दिल्या. दिंडीचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. सुनल व्यवहारे (किनवट), प्रा. पंजाब चव्हाण (भोकर) हे करीत आहेत. यात विविध महाविद्यालयाचे एकूण दहा विद्यार्थी सहभागी झाले होते.

## संजीव लाटकर यांचा अमेरिका दौरा

'आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी आणि जागतिक सहकार्य' या विषयावरील अभ्यास दौऱ्यावर अमेरिकी सरकारच्या निमंत्रणावरून 'सकाळ'च्या मुंबई आवृत्तीचे संपादक संजीव लाटकर गेले आहेत. या अभ्यास दौऱ्यासाठी जगभरातून पंचवीस जणांची निवड झाली आहे. भारतातील आसामातील नागा बंडखोरांच्या संदर्भातील सुरक्षा सल्लागार जयदीप सैकिया यांचाही या दौऱ्यात समावेश झाला आहे. इतर अभ्यासकांमध्ये विविध देशांतील वरिष्ठ सुरक्षा अधिकारी, इंटरपोलचे निरीक्षक, पोलिसप्रमुख आदींचा समावेश आहे. या दौऱ्यात अमेरिकेतील दहशतवादाचे स्वरूप, तेथील न्यायव्यवस्था, गुन्हेगारीची आंतरराष्ट्रीय व्याप्ती, दहशतवाद हाताळण्यासंदर्भातील अमेरिकेचे धोरण, जागतिक स्थैर्यावर आणि आर्थिक जगतावर होणारा दहशतवादाचा परिणाम या विषयांची त्यांनी माहिती घेतली.

## सवंग नाटकांच्या विरोधात आवाज उठवायला हवा

दर्जेदार नाटकांच्या वेळी ओस पडलेली प्रेक्षागृहे आणि देवदेवतांची विडंबने करून सवंग करमणूक करणाऱ्या नाटकांना होणारी गर्दी हे रसिकांच्या मागासलेपणाचे लक्षण असून, अशा नाटकांविरोधात कलाकार, दिग्दर्शक, निर्माते यांनी एकत्रितपणे आवाज उठविण्याची गरज आहे, असे मत ज्येष्ठ अभिनेते चंद्रकांत गोखले यांनी व्यक्त केले.

'संवाद' या संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या कोथरूड उपनगरीय नाट्यसंमेलनात ते बोलत होते. नाट्यसंमेलनाचे उद्घाटन प्रख्यात अभिनेते विक्रम गोखले यांच्या हस्ते झाले. नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष डॉ. विश्वास मेहेंदळे हे होते.

## सात कवयित्रींचा रंगधनू

''आपापल्या उद्योगात मग्न असूनही सात कवयित्री एकत्र येऊन काव्यसंग्रह प्रकाशित करतात, कवितेकडे एका वेगळ्या दृष्टीने बघतात ही एक आश्वासक गोष्ट आहे,'' असे ज्येष्ठ कवयित्री सरिता पदकी यांनी म्हटले. नीहारा प्रकाशनातर्फे काढण्यात आलेल्या 'रंगधनु' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले, प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. दि. पुंडे, अभिनेत्री सुषमा देशपांडे व बारामती कृषी विकास प्रतिष्ठानच्या विश्वस्त रजनी इंदूलकर

हे उपस्थित होते. प्रा. सुनीता कुलकर्णी, प्रा. सुनीता आहेरराव, प्रा. सुरेखा भाग्यवंत, प्रा. सविता पिंगळे, प्रा. ज्योती जोशी, प्रा. लता महाजन, प्रा. आश्लेषा मुंगी यांच्या कवितांचा या काव्यसंग्रहात समावेश आहे.

नीहारा प्रकाशनच्या डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. महाजन यांनी आभार मानले.

## 'देशमुख दांपत्याचा विक्रम'

''आपल्या नाट्यप्रवासाचा रौप्यमहोत्सव 'नाट्य पंचका'द्वारे साजरा करून अविनाश आणि स्वाती देशमुख यांनी रंगभूमीला आगळे वेगळे योगदान दिले आहे. या उपक्रमाचे मनापासून कौतुक करताना माझ्यासारख्या रंगकर्मीला विलक्षण आनंद होत आहे,'' असे गौरवोद्गार प्रसिद्ध अभिनेते अमरीश पुरी यांनी काढले.

'रसिकानंद' आणि 'मित्र परिवार' यांनी आयोजित केलेल्या देशमुख दांपत्याच्या प्रमुख भूमिका असलेल्या पाच नाटकांच्या (नाट्यपंचकाच्या) प्रयोगाच्या वेळी ते बोलत होते. ज्येष्ठ अभिनेते चंद्रकांत गोखले, महापौर दीप्ती चौधरी, जागतिक मराठी परिषदेचे मॉरिशस येथील अध्यक्ष वीरजनन मालू या वेळी उपस्थित होते. देशमुख दांपत्याचे कौतुक करून अमरीश पुरी म्हणाले, ''एकाच दिवसात पाच वेगवेगळे नाट्यप्रयोग सादर करण्यासाठी शारीरिक क्षमता, जबरदस्त जिद्द आणि रंगभूमीवर प्रेम असावे लागते. या सर्व गोष्टी देशमुख दांपत्यामध्ये असल्यामुळेच प्रेक्षकांनीही त्यांना स्वीकारले आहे.'' श्रीमती चौधरी, श्री. गोखले यांचीही भाषणे झाली. अभिनेत्री लीला गांधी,लालन सारंग, आशू, मनीषा साठे आणि शैला दातार यांनी पाच फिती कापून महोत्सवाचे उद्घाटन केले. डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. 'नाट्यपंचक' महोत्सवात 'प्रेमाच्या गावा जावे', 'कुलकर्ण्यांचं स्थळ', 'चुकभूल द्यावी घ्यावी', 'रायगडाला जेव्हा जाग येते' आणि 'पुरुष' ही पाच नाटके सादर केली.

## नगरच्या 'एमआयआरसी'मध्ये जवानांसाठी सुसज्ज ग्रंथालय

वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांसाठी सर्वत्र व सर्व प्रकारच्या उत्कृष्ट दर्जाच्या सुविधा असतात. पण या सुविधा साध्या जवानांनाही देणारे नगरचे मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटर (एमआयआरसी) हे देशातील एकमेव लष्करी केंद्र ठरले आहे. एमआयआरसीमध्ये जवानांसाठी अद्ययावत व वातानुकूलित सुसज्ज ग्रंथालय जानेवारी मध्ये सुरू झाले.

एमआयआरसीच्या नगर केंद्राने जवान व त्यांच्या कुटुंबीयांसाठी केंद्र 'सैनिक इन्स्टिट्यूट' गेल्या वर्षी सुरू केली. या केंद्रातच सुसज्ज ग्रंथालय उभारण्यात आले. या ग्रंथालयाचे उद्घाटन एमआयआरसीचे कमांडंट ब्रिगेडियर व्ही.के.वर्मा यांच्या पत्नी किरण वर्मा यांनी केले. मरणोत्तर 'कीर्तिचक्र' मिळविलेले एमआयआरसीचे (दहा मेकॅ.इन्फंट्री) जवान दया शंकर यांच्या स्मरणार्थ हे ग्रंथालय उभारण्यात आले आहे. शहीद दया शंकर यांच्या कार्याची माहिती देणाऱ्या कोनशिलेचे अनावरण ब्रिगेडियर वर्मा यांच्या हस्ते झाले.

हे ग्रंथालय उभारण्याची कल्पना श्री. वर्मा यांची आहे. जवानांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशिक्षण व प्रशासन या दोन्हीबाबत एमआयआरसीचे नगरचे केंद्र देशात सर्वोत्तम बनविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या ग्रंथालयाबद्दल विभागप्रमुख लेफ्टनंट कर्नल संजय कपूर म्हणाले,''हे ग्रंथालय



विक्रमी वेळेत उभारण्यात आले. यासाठी दीड लाख रुपये खर्च आला. त्यात देशातील सर्व भाषांतील व सर्व विषयांतील पाच हजार पुस्तके आहेत. याशिवाय लष्करी नियतकालिके, नॅशनल जिऑग्राफिकसारखी नियतकालिके, साप्ताहिके व नगरमध्ये मिळणारी सर्व वृत्तपत्रे जवान व त्यांच्या कुटुंबीयांसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत.'' या ग्रंथालयाशेजारीच जवान व त्यांच्या कुटुंबीयांसाठी सुसज्ज व अत्याधुनिक असा हेल्थ क्लबही आहे. लहान मुलांसाठी सर्व सोयींनी युक्त असा 'पार्क' व इंटरनेट केंद्र लवकरच सुरू करीत असल्याचे, ब्रिगेडियर वर्मा यांनी जहीर केले.

## महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार वितरण

कडेलोट होत असलेल्या धर्मांधतेला राजकीय सत्ता, जनआंदोलने आणि समाजपरिवर्तनाच्या प्रमुख साधनांचा एकत्रित वापर करूनच समतेचा लढा उभारला गेला पाहिजे, अशी अपेक्षा ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांनी व्यक्त केली.

केशव गोरे स्मारक ट्रस्ट आयोजित महाराष्ट्र फाऊंडेशन मराठी साहित्य पुरस्कार वितरण समारंभात त्यांना प्रख्यात आसामी लेखिका इंदिरा गोस्वामी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला,

सार्वजनिक जीवनात घसरत चाललेल्या नैतिकतेला सामाजिक न्याय देणाऱ्या विवेकनिष्ठ व्यक्तीच तारू शकतील, असा विश्वास प्रधान यांनी व्यक्त केला. या समारंभात साहित्यिक निरंजन उजगरे, शफायत खान, रवींद्र शोभणे, जया दडकर, डॉ. म. अ. मेहेंदळे, केशव मेश्राम व दत्ता भगत यांनाही गौरवण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी पुन्हा एकदा टोकाची आणीबाणीची परिस्थिती निर्माण होत आहे, ही प्रा. प्रधान व अन्य वक्त्यांची भीती निराधार आहे असे सांगितले. ''लोकशाहीच्या विरोधातील भावना लोकशाहीत व्यक्त होतच असतात'', असे सांगून ते म्हणाले की, विमान अपहरणाप्रमाणे हिंदुत्वाचे हायजॅक करणारे लोक जनतेच्या अज्ञानाचा फायदा उठवून रामायणावर आधारित खोट्या चळवळी चालवतात. तसेच आपल्या राष्ट्राला खरवडून खात दुसऱ्या राष्ट्राचा द्वेष करणारेच राष्ट्रप्रेमी ठरत आहेत, असे शरसंधानही त्यांनी केले.

साहित्य व समाजपरिवर्तनाच्या व्यवहारात राष्ट्रीय साहित्य निर्माण होण्यासाठी देशातील इतर भाषांतील पुस्तकांची भाषांतरे होणे व ती वाचली जाणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. दलित साहित्य हे फक्त महाराष्ट्रात निर्माण झाले यामागे महाराष्ट्रातील प्रतिकूल परिस्थिती कारण होती. तथापि, देशात प्रत्येक भाषेत दलित साहित्य असणे हे निश्चितच शोभादायक नाही, हे पुढच्या पिढीने लक्षात घ्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

केशव गोरे ट्रस्टच्या अध्यक्षा मृणाल गोरे, पुरस्कार निवड समितीचे निमंत्रक दिगंबर पाध्ये, महाराष्ट्र फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनील देशमुख यांची भाषणे यावेळी झाली. संवादिनी या स्मरणिकेचे प्रकाशनही झाले.

## संत तुकारामांच्या अभंगांचा इंग्रजी अनुवाद

तुकाराम महाराजांच्या सुमारे बाराशे अभंगांचा ज्येष्ठ साहित्यिक दिलीप चित्रे यांनी इंग्रजीत केलेला अनुवाद सोन्थायमर कल्चरल असोसिएशनतर्फे तीन खंडांत प्रकाशित केला जाणार आहे.

तुकारामांच्या निवडक अभंगांच्या अनुवादांचे 'सेज तुका'हे पुस्तक १९९१ मध्ये 'पेंग्विन बुक्स'ने प्रकाशित केले. जागतिक पातळीवरील अभ्यासकांनी त्याची नोंद घेतली. साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला. काही निवडक अभंगांचा अनुवादच 'सेज तुका'मध्ये आहे. यामुळे सर्व बाराशे अभंगांचे अनुवाद तीन खंडांत प्रकाशन करण्यात येणार आहे. 'सेज-तुका-१'हे या मालिकेतील पहिले पुस्तक असणार आहे.

या नव्या पुस्तकात नवी टिपणे आहेत; तसेच हायडेलबर्ग विद्यापीठात १९८८ मध्ये श्री. चित्रे यांनी केलेले व्याख्यानही त्यांत आहे. 'सेज तुका'चे जर्मन अनुवादक लॉथर लुत्झ हे आहेत.

### जिल्हा व तालुका ग्रंथालये संगणकीय साखळीने जोडणार

देशभरात 'इलेक्ट्रॉनिक ग्रंथालये' स्थापन करून, संगणकीय साखळीने जिल्हा व तालुका पातळीवरील ग्रंथालये जोडण्याची योजना केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे.

ग्रंथालय संस्कृतीला प्रगत तंत्रज्ञानाची जोड देऊन ग्रामीण भागासह पूर्ण देशभर ग्रंथालयांचे जाळे उभारण्याच्या दृष्टीने केंद्रीय सांस्कृतिक कार्य विभागाने प्रकल्प अहवाल सादर केला आहे. या अहवालास अनुसरून केंद्र सरकारने नवे धोरण स्वीकारल्यास, सध्या मागे पडत चाललेल्या ग्रंथालय चळवळीला चांगले दिवस येतील. या अहवालात व्यक्त करण्यात आलेल्या अपेक्षेनुसार, खासदारांनी त्यांच्या मतदारसंघ विकासनिधीतून अशा ग्रंथालयांसाठी प्रत्येकी किमान तीन लाख रुपये द्यायचे आहेत. राज्य सरकारनेही आपला काही वाटा उचलावा, अशी अपेक्षा आहे. खासदार - आमदारांच्या मतदारसंघ विकासनिधीतून देशभरात समृद्ध ग्रंथालये उभी राहू शकतील व त्याचा ग्रंथालय चळवळ फोफवायला मदत होईल, असा विश्वास या अहवालात व्यक्त केला आहे.

संगणकाच्या साह्याने ग्रंथालये एकमेकांशी जोडल्यानंतर सर्व भाषांमधील पुस्तके तेथे उपलब्ध करण्यात येणार आहेत. त्यासाठी वाचक व प्रकाशक यांचीही मदत घेण्यात येणार आहे. प्रकाशकाकडे संगणकावर तयार झालेल्या मुद्रणाची 'फ्लॉपी' करून ते ग्रंथालयातील संगणकावर घेण्याचा विचार आहे.

या प्रकल्पाचा अंतिम अहवाल तयार करण्यापूर्वी प्रकाशन क्षेत्रातील, ग्रंथालय क्षेत्रातील, तसेच साहित्य संस्थांमधील मान्यवरांकडून सूचनाही मागवण्यात येणार आहेत. या प्रकल्पाची पूर्ती करताना कायदेशीर अडचणी उभ्या राहू नयेत, या दृष्टीनेही अभ्यास करण्यात येत आहे.

### 'आशय'तर्फे मराठी चित्रपटांच्या समग्र सूचीचा प्रकल्प

मराठी चित्रपटसृष्टीच्या आजवरच्या इतिहासाची वाटचाल सांगणारी मराठी चित्रपटांची समग्र सूची तयार करण्याचा प्रकल्प आशय फिल्म क्लब आणि व्ही. शांताराम फाउंडेशन यांच्या सहकार्याने सुरू केल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष किरण शांताराम यांनी दिली.

'पाथफाईंडर'या पुण्यातील नूतन दुमजली पुस्तकांच्या दालनात चित्रपटविषयक मराठी व इंग्रजी पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

किरण शांताराम पुढे म्हणाले, ''आजवर मराठी भाषेत निर्माण झालेल्या सुमारे बाराशे चित्रपटांची सूची तयार करण्याचा प्रकल्प आम्ही सुरू केला आहे. या कामासाठी फाउंडेशनतर्फे आशयला संगणक संचही देण्यात येणार आहे. चांगल्या चित्रपटांची आवड प्रेक्षकांमध्ये निर्माण करून चित्रपटाचा प्रेक्षक वाढविण्याचा प्रयत्न करणे, हा आमचा हेतू आहे.''



बदलत्या काळात प्रेक्षकही बदलला आहे. त्याच्या आवडीनिवडी, मनोरंजनाच्या कल्पना, अपेक्षा, विषय, तंत्रज्ञान, अभिरुची सर्वच बाबतींत वेगाने बदल घडत आहेत. अशा नव्या प्रेक्षकालाही जगभरातील उत्तम चित्रपट पाहता यावेत या साठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

चित्रपटविषयक पुस्तकांच्या प्रदर्शनात चरित्रे, आत्मचरित्रे, संदर्भ, कोश, चित्रपटकथा, संवाद, गाणी, चित्रपट बनत असतानाचा कालपट, तंत्रज्ञान, चित्रीकरण, नेपथ्य... अशा विविध विषयांवरील सुमारे ४०० पुस्तकांचा समावेश होता.

वीरेंद्र चित्राव यांनी प्रास्ताविकात आशयची आजवरची वाटचाल थोडक्यात मांडली. प्रदीप खिरे यांनीही मनोगत व्यक्त केले. सुजाता गोडबोले यांनी सूत्रसंचालन केले.

### 'एकपात्री कलाकारांनी बहुजन समाजात कला सादर करावी'

एकपात्री कलाकारांनी बहुजन समाजामध्ये आपली कला सादर करून सामाजिक गुणवत्तेचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न करावा, असे जनता सहकारी बँकेचे कार्याध्यक्ष अरविंद खळदकर यांनी एकपात्री कला महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी सांगितले. अभिनेत्री लालन सारंग प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

श्री. खळदकर म्हणाले, ''एकपात्री कला निखळ आणि सोज्वळ करमणूक करणारी आहे; एकपात्री कलाकार संघाच्या निमित्ताने धडपडणाऱ्या एकपात्री कलाकारांसाठी व्यासपीठ निर्माण झाले आहे. संघाने समस्या मांडण्याबरोबरच या व्यासपीठावर अधिकाधिक कलाकारांना संधी द्यावी.''

श्रीमती सारंग म्हणाल्या, ''एकपात्री कला ही नाटकातील अभिनयापेक्षा अवघड आहे. यामध्ये प्रेक्षकांना सलग दोन-अडीच तास गुंगवून ठेवावे लागते. त्यासाठी मोठ्या मानसिक व शारीरिक ताकदीची आवश्यकता असते. नाटकातील अभिनेत्यांप्रमाणे एकपात्री कलाकारांना कोणतीही संगत नसते. शिवाय वक्तृत्वही प्रभावी असणे आवश्यक असल्याने हा कलाप्रकार आव्हानात्मक आहे.''

रंगमंदिरांनी आपल्या भाड्यात व प्रसारमाध्यमांनी जाहिरातीत सूट देऊन एकपात्री कलाकारांना मदत करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

संघाचे अध्यक्ष डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी प्रास्ताविक केले. सदानंद चांदेकर यांनी आभार मानले. मंजिरी धामणकर यांनी सूत्रसंचालन केले.

### धर्मांधतेच्या महापुरात प्रवाहाच्या विरोधात लढणे आवश्यक

धर्मांधतेच्या महापुरात अनेक गावे उद्‌ध्वस्त होण्याचा, अनेकांची मने दुभंगण्याचा धोका आहे. तो टाळण्यासाठी आपणास प्रवाहाच्या विरोधात लढायचे आहे. त्यामुळे त्रास झाला तरी, तो सोसायलाच हवा, कारण समाजपरिवर्तन आणि अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ म्हणावी तितकी सोपी नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी केले.

इचलकरंजीतील 'अंनिस'च्या राज्यव्यापी अधिवेशनात समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अभिनेते निळू फुले होते.

डॉ. पटेल पुढे म्हणाले, की आज जातीयवादी शक्ती डोके वर काढत आहेत. केवळ भारतातच नव्हे, तर जागतिक स्तरावरही याचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसून येते. अशा शक्तींना सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी आपल्या विचारांनी रोखायला हवे. धर्मांधतेपेक्षा मानवता

श्रेष्ठ ही भूमिका पटवून द्यायला हवी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसह अनेक समाजधुरिणांनी मानवतेच्या हक्कांसाठी प्रस्थापितांविरुद्ध लढा दिला. ला लढा देताना त्यांना अनेक अडचणीही आल्या, पण त्यावर त्यांनी मात करीत नि:संदिग्ध विजय संपादन केला. १९४७ मध्ये देशाची फाळणी झाली. ज्या मुस्लिमांना इथे रहायचे आहे, ते इथे राहिले. फाळणीमुळे त्यांची मने दुभंगली नसताना स्वातंत्र्याच्या ५० वर्षानंतरही पुन्हा मने दुभंगण्याचा प्रयत्न केला जात आहे, तो थांबायला हवा.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ताकवले, नागनाथअण्णा नायकवडी, आ. सा. रे. पाटील, ज्येष्ठ विचारवंत श्रीमती पुष्पा भावे, किसनराव देशमुख, अंनिसचे अध्यक्ष एन. डी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'फुलब्राईट' चा दृष्टिकोन बदलण्याची गरज - डॉ. नाईक

जागतिकीकरणाच्या युगामध्ये शिक्षणाकडे आता सेवा म्हणून पाहिले जात आहे, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचीही अनेक बलस्थाने असून बौद्धिक क्षेत्रातील आघाडी सर्वमान्य आहे. अशा परिस्थितीत 'फुलब्राईट अभ्यासवृत्ती'संदर्भात अमेरिकेने आपला दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे, असे मत शिक्षणतज्ज्ञ चित्रा नाईक यांनी व्यक्त केले. 'फुलब्राईट अल्यासवृत्ती'चा लाभ घेतलेल्या व्यक्तींचा पुण्यात मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या निमित्ताने जागतिक शिक्षणव्यवस्था, शैक्षणिक आदानप्रदान कार्यक्रम, आदींबाबत डॉ. नाईक यांनी म्हटले,'मी १९५३-५४ मध्ये 'फुलब्राईट'च्या माध्यमातून अमेरिकेला गेले होते. त्या वेळची परिस्थिती अगदी निराळी होती. शिक्षण-संशोधन क्षेत्रासाठी निधी नव्हता, देशातील शैक्षणिक सुविधाही प्रगत नव्हत्या. आंतरराष्ट्रीय स्तरावर केवळ सोव्हिएट युनियन, ब्रिटन व अमेरिकेमधील संधीच उपलब्ध होत्या. आज मात्र परिस्थिती पूर्णत: बदलली आहे. राष्ट्रीय संशोधनप्रयोगशाळा, राष्ट्रीय तंत्रज्ञान, व्यवस्थापन संस्था आणि संशोधकांनी केलेल्या कामगिरीमुळे बौद्धिक संपदा क्षेत्रात भारताने आघाडी घेतली आहे. तिला जगत्मान्यताही मिळाली आहे.'सिलिकॉन व्हॅली'त आज भारतीय बौद्धिक संपदा लखलखत आहे. केवळ ब्रिटन-अमेरिकेचा पर्याय न राहता आता इतर देशांमधील संधींची दारेही भारतासाठी खुली झाली आहेत. वास्तविक विविध शिष्यवृत्तींच्या माध्यमातून प्रगत देशांनी सांस्कृतिक साम्राज्यवाद पसरविण्याचा प्रयत्न केला. पण आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर भारतीयांनी त्यांच्यावर कडी केली,'

'फुलब्राईट'सारखे उपक्रम संदर्भहीन झाले आहेत का, याचा विचार करण्याची गरज आहे, असे सांगून डॉ. नाईक म्हणाल्या की, भारतीय अभ्यासकांचा दृष्टिकोन तपासण्याची गरज आहे. परदेशातील तज्ज्ञ आपल्याकडून येऊन इथल्या समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंतही पोचतात, इथली माहिती वापरतात आणि त्यावर संशोधन करतात. भारतीय संशोधकांनीही केवळ परदेशी जाऊन संशोधन करण्यावर समाधान न मानता, तेथील संस्कृती-समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, भारतीय परिस्थितीशी त्याची तुलना आदींबाबत अभ्यास करावा. त्या संदर्भात उभय देशांमध्ये संवाद प्रस्थापित करावा. शिष्यवृत्ती प्रदान करतानाही केवळ संबंधित संशोधन पूर्ण झाले की प्रकल्प संपला, असे न मानता शिष्यवृत्तीच्या माध्यमातून प्रस्थापित झालेले संपर्क दृढ करण्यासाठी प्रयत्न व्हावेत. त्यासाठी 'फुलब्राईट' मिळविलेल्या व आपापल्या क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या जगभरातील तज्ज्ञांनी एकत्र येण्याची गरज आहे. शिक्षणाचे जागतिकीकरण होताना आपण केवळ 'रिसिव्हिंग एण्ड'ला राहू नये. पश्चिमेकडील ते चांगले, आपले ते मागास



ही मनोवृत्ती सुधारावी. आपल्याकडील सांस्कृतिक वैविध्य, इतिहास, समाजरचना, धर्मव्यवस्था, पुरातत्त्वशास्त्र, वैज्ञानिक प्रगती आदींची पाश्चिमात्यांना माहिती करून देण्यासाठी उपक्रम हाती घेण्याची गरज आहे. 'फुलब्राईट'नेही त्याचा विचार करावा. आपल्या देशाच्या भवितव्यासाठी कोणत्या प्रकारचे शिक्षण - संशोधन आवश्यक आहे, याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी राष्ट्रीयत्वाच्या मूल्यांच्या आधारे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन वर्ग घेता येतील. केवळ उपजीविकेच्या साधनासाठी शिक्षण-संशोधनाकडे न पाहता ती एक निरंतर प्रक्रिया आहे याची जाणीव ठेवावी. त्या भूमिकेतून शिष्यवृत्तीचे निकष ठेवावेत, अशी अपेक्षा डॉ. नाईक यांनी व्यक्त केली.

## 'एडिज लाईव्ह शो': सर्वोत्कृष्ट एकांकिका

चतुरंग प्रतिष्ठान आयोजित सवाई एकांकिका स्पर्धेत पुण्याच्या 'जागर' आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालयाने यंदा बाजी मारली. 'जागर'च्या 'एडिज लाईव्ह शो' या एकांकिकेने प्रथम, तर गरवारे महाविद्यालयाच्या 'डायरी ऑफ अण्णा फाटक' या एकांकिकेने द्वितीय पारितोषिकाचा मान पटकावला.

चतुरंगच्या सवाई एकांकिका स्पर्धेचे हे सोळावे वर्ष होते. स्पर्धेची अंतिम फेरी प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहात पार पडली.

विविध पारितोषिके : सवाई एकांकिका प्रथम : शकुंतला गणेश सोळंकी स्मृती पारितोषिक व रु. १० हजार अरुणकुमार वेलणकर सन्मानचिन्ह : 'एडिज लाईव्ह शो' (जागर, पुणे).

सवाई एकांकिका द्वितीय : बाळ कोल्हटकर स्मृती पारितोषिक व रु. सात हजार - वामर हरी पेठे पुरस्कृत सन्मानचिन्ह. 'डायरी ऑफ अण्णा फाटक' (आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे).

सवाई लेखन : बाळ कोल्हटकर स्मृती पारितोषिक रु. एक हजार आणि कलाकार पुरस्कृत सन्मानचिन्ह : भाग्यश्री जाधव ('इन्व्हेस्टमेंट': आविष्कार, मुंबई).

सवाई दिग्दर्शक : द. ग. फणसे सन्मानचिन्ह आणि बाळ कोल्हटकर स्मृती पारितोषिक, रु. एक हजार : ऋता पंडित ('एडिज लाईव्ह शो' : जागर, पुणे),

सवाई अभिनेता : मनोहर वेदपाठक स्मृतिप्रीत्यर्थ सन्मानचिन्ह आणि बाळ कोल्हटकर स्मृती पारितोषिक रु. एक हजार : प्रसाद शेंडे ('एडिज लाईव्ह शो' : जागर, पुणे),

सवाई अभिनेत्री : मनोहर वेदपाठक सन्मानचिन्ह आणि गणेश सोळंकी स्मृती पारितोषिक रु. एक हजार : स्निग्धा सबनीस ('इन्व्हेस्टमेंट' : आविष्कार, मुंबई).

सवाई प्रकाशयोजना : रामकृष्ण टेंबे पुरस्कृत सन्मानचिन्ह आणि गणेश सोळंकी स्मृती पारितोषिक रु. एक हजार : सचिन टेकाळे ('एडिज लाईव्ह शो' : जागर, पुणे).

सवाई ध्वनिसंयोजन : इंदिराबाई गोगटे सन्मानचिन्ह आणि गणेश सोळंकी स्मृती पारितोषिक एक हजार : प्रदीप वैद्य ('एडिज लाईव्ह शो' : जागर, पुणे),

सवाई नेपथ्यकार : गणेश सोळंकी स्मृती पारितोषिक रु. एक हजार : ऋता पंडित ('एडिज लाईव्ह शो' : जागर, पुणे).

प्रेक्षक पारितोषिक : बाळ कोल्हटकर स्मृती पारितोषिक रु. दोन हजार : 'डायरी ऑफ अण्णा फाटक', आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे.

## 'हॉलिवूड' आणि 'बॉलिवूड' अशी तुलना अयोग्य : अमरीश पुरी

हॉलिवूड आणि बॉलिवूड असे साम्य शोधणे पूर्ण चुकीचे असून, ही तुलना अयोग्य आहे. 'हॉलिवूड'ला 'हॉलिवूड'च राहू द्यावे आणि तथाकथित 'बॉलिवूड'ला स्पष्टपणे 'भारतीय चित्रपटसृष्टी'असे संबोधावे, असे मत हिंदी चित्रपटसृष्टीतील बुजुर्ग अभिनेते अमरीश पुरी यांनी शर्मिला भिंगावालालिखित '१०० पार्टी गेम्स' या पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले. ते खासदार प्रदीप रावत व 'इंडियन एक्सप्रेस'च्या विनिता देशमुख व्यासपीठावर उपस्थित होत्या. हृदयमित्र प्रतिष्ठानचे संस्थापक श्रीकांत मुंदडा यांनी अमरीश पुरी यांच्याशी बातचीत केली.

अगदी मोजक्या वेळात अमरीश पुरी यांनी प्रश्नकर्त्यांची 'विकेट' घेत आपली मते मांडली. 'हॉलिवूड' आणि 'बॉलिवूड' हा प्रकारच बोगस आहे. शहराच्या नावापुढे 'वूड' लावून तो दर्जा, त्या कल्पना, तो अभिनय, ते नावीनरु, ती सफाई, सहजता आणि व्यावसायिकता येऊ शकत नाही, असेच पुरी यांनी स्पष्ट केले.

चित्रपटसृष्टीत पुरस्कारांची भाऊगर्दी झाली असून, ज्या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक हे पुरस्कार देतात, मानांकने जाहीर करतात. त्यांची निवड करणारे त्यासाठी लायक असतात का, त्यांना अभिनयातील, दिग्दर्शनातील, संगीतातील ज्ञान असते का, ही सारीच प्रश्नचिन्हे आहेत. प्रायोजकत्व स्वीकारणाऱ्या बड्या कंपन्या बोगस आहेत. त्यांना फक्त प्रसिद्धी, जाहिरात आणि धंद्यात रस असतो. कलेशी देणेघेणे नसते, असे ते म्हणाले. '७० टक्के ते चूक आणि ३० टक्के बरोबर' असे समीकरण मानून मला जेव्हा पुरस्कार दिला जातो तेव्हा मी तो ३० टक्क्यांतील समजून स्वीकारतो, याचाही त्यांनी उल्लेख केला.

## साहित्य क्षेत्रातील वाढत्या विकृतींच 'लेखी बोले' मध्ये चित्रण

उपहासगर्भ शैलीत प्रसिद्ध चित्रकार रविमुकुल यांनी 'लेखी बोले'या पुस्तकातून साहित्य क्षेत्रातील वाढत्या विकृतींचे चित्रण केले आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक ह. मो. मराठे यांनी व्यक्त केले. 'लेखी बोले' या पुस्तकाचे प्रकाशन मराठे यांच्या हस्ते करण्यात आले. विनोदी लेखक शिरीष कणेकर व मंगला गोडबोले उपस्थित होते. या अपप्रवृत्तींवर रविमुकुल यांच्यासारख्या साहित्यसृष्टीचा जवळून परिचय असलेल्या चित्रकाराने आपल्या उपहासपूर्ण शैलीत कोरडे ओढले आहेत. त्यांचे हे गद्य विडंबन अव्वल दर्जाचे आहे. चांगले लेखक आपले लेखन मध्येच थांबवतात. ते वाचकांचे नुकसान करणारे असते. पण, चांगले लेखन न करणारे लेखक सतत लिहीत राहतात. ते वाचकांचे अधिक नुकसान करणारे ठरते. या पार्श्वभूमीवर रविमुकुल यांचे लेखन आशादायक आहे, असे शिरीष कणेकर म्हणाले. पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी यांनी निर्माण केलेला उपहासपूर्ण लेखनाचा बाज रविमुकुल यांच्या लेखनात आढळतो. सध्याच्या मराठी साहित्य विश्वाची दु:स्थिती पाहून उद्विग्न भावावस्थेत केलेले हे लेखन रविमुकुल यांचे मराठी साहित्यावरील सूक्ष्म प्रेम प्रकट करते, असे मंगला गोडबोले यांनी सांगितले.

रविमुकुल यांचेही या वेळी भाषण झाले. प्रकाशक मराठे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मधुरा डहाणूकर यांनी सूत्रसंचालन केले.



## आजच्या पिढीचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा

''आजच्या मुलामुलींची पिढी खूपच धाडसी आहे. तिचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा आहे. तिने आपल्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घ्यावा. आयुष्यात मिळणाऱ्या संधीचा चांगला उपयोग करावा. त्यासाठी उपयुक्त असलेले आकलन, खूप वाचण्याची सवय व चांगले ऐकण्याच्या संस्कारातूनच संपादन करावे लागेल,'' असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन संस्थेचे अध्यक्ष शंकर सारडा यांनी अहमदनगर येथील तुषार गार्डन मंडपात आयोजित बालसाहित्य जत्रेच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून केले.

रावसाहेब पटवर्धन स्मारक समितीचे या जत्रेच्या आयोजनाबद्दल अभिनंदन करून ते पुढे म्हणाले, ''यापुढील काळात व्यक्तीची किंमत तिच्याजवळील ज्ञान पाहून केली जाईल. आजच्या विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान सातत्याने वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. साहित्य जत्रेसारखे उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक विकसित करण्यासाठी निश्चितपणे उपयोगी ठरतील.'' समारोप समारंभात श्री. सारडा यांच्या हस्ते शहर माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष अभिमन्यू चव्हाण, सरचिटणीस सुनील पंडित, डॉ. श्रीधर राजगुरू, रावसाहेब पटवर्धन स्मारक समितीचे अध्यक्ष म. वि. देवचके आदींचा सत्कार करण्यात आला. शिल्पा रसाळ यांनी आभार मानले. संध्या कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनीच्या 'छात्र प्रबोधन' या मासिकाच्या कार्यकारी संपादिका दीपाली गोगटे यांनी 'कथालेखन कार्यशाळेत' विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'सकाळ'चे व्यंगचित्रकार वैजनाथ दुलंगे यांनी प्रात्यक्षिकाद्वारे व्यंगचित्रातून मनोरंजन कसे करावे, याची माहिती दिली. संमेलनाध्यक्ष पु. ग. वैद्य यांनी 'गणितातील गमतीजमती' व 'वाचन संस्कृतीतून अभ्यासात यश' या विषयावर विवेचन केले. दत्ता टोळ यांच्या 'कोण होईल वाचकवीर' या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला.

## दत्ता वाकणकर यांच्या पुस्तकातून सामान्यातील असामान्यांचे दर्शन

सामान्यातील असामान्यांचे दर्शन दत्ता वाकणकर यांनी आपल्या 'वणव्यातले ओलावे' पुस्तकातून घडवले आहे, अशा शब्दांत खासदार सुरेश प्रभू यांनी वाकणकर यांचा गौरव केला.

सिग्नेट पब्लिकेशन्सच्या वतीने 'वणव्यातले ओलावे' या पुस्तकाचे प्रकाशन प्रभू यांच्या हस्ते व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती महामंडळाचे उपाध्यक्ष रतनलाल सोनग्रा यांच्या उपस्थितीत झाले.

जगातील प्रत्येक घटनेकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास जगाची खरी ओळख होते, असे सांगून प्रभू म्हणाले की, वास्तविक वाकणकर यांना घरातील साहित्यिक परंपरा नाही. तरीही त्यांच्या या सकारात्मक दृष्टीने केलेल्या अनुभवकथनामुळे मराठीपासून दुरावलेला वाचक पुन्हा मराठीकडे येण्यास मदत होणार आहे, असेही प्रभू म्हणाले.

मराठी माणूस आपला गाव, देश सोडून बाहेर जात नाही पण धाडस म्हणून वाकणकर अरब देशात गेले आणि तेथील जीवनानुभवाचा परिपाक या पुस्तकात आहे, असे सोनग्रा यांनी सांगितले.

प्रमोद आडकर यांनी स्वागत केले, तर विनीता आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

## एकविसाव्या शतकातील स्त्री सर्जनशीलच असेल : अरुणा ढेरे

एकविसाव्या शतकातील स्त्री ही लिंगभेदाच्या पलीकडे व 'सर्जनशील' अशीच असेल, असा विश्वास प्रसिद्ध लेखिका डॉ. अरुणा ढेरे यांनी व्यक्त केला. गेल्या दोन शतकांमध्ये स्त्रियांनी दिलेले लढे आजच्या पिढीने लक्षात घेतले, तर आज मिळालेल्या सवलतींचा व फायद्यांचा आपण उपयोग करून घेत नाही, हे जाणवते, अशी खंतही बोलून दाखविली.

''एका बाजूने परिस्थितीने पिचलेली, तर दुसऱ्या बाजूने समर्थपणे सर्व संकटांना खंबीरपणे तोंड देत उभी राहिलेली अशी भारतीय स्त्रीची रूपे लोकवाङ्मय, मिथक आणि सभोवतालच्या वास्तवातून मला दिसत गेली व 'बाई'पणाच्या वेदना, आकांक्षा माझ्या लेखनातून उमटत राहिल्या,'' असे डॉ. ढेरे यांनी सांगितले.

दूरसंचार, माहिती व तंत्रज्ञान खात्याच्या राज्यमंत्री सुमित्रा महाजन यांनी, राजकारणाला नावे न ठेवता, आपण त्यात उतरून ते सुधारण्याचे आव्हान स्वीकारण्याची गरज प्रकट केली. 'साहित्यिक गप्पा' या कार्यक्रमात श्रीमती महाजन व डॉ. ढेरे यांनी आपल्यावरील संस्कार, कामाच्या प्रेरणा व येणारे अनुभव उपस्थितांना सांगितले.

या कार्यक्रमाला वनिता समाजाच्या संस्थापिका कमलाताई प्रधान, सुनीता गाडगीळ, चंपाताई लिमये; तसेच डॉ. अरुण निगवेकर, आमंत्रित मंडळी व समाजाच्या सदस्या हजर होत्या

**बुकमार्कचे प्रकाशन**

निर्धार व मृद्‌गंधतर्फे ध्वनी, हवा व पाणी प्रदूषण जागृती तसेच वाहतूक शिस्त, इंधन बचत यासंबंधी प्रबोधनपर संदेशांचे ५००० बुकमार्क्स छापण्यात आले असून ते पुण्यातील ग्रंथालयांना वाटले जाणार आहेत. यासाठी छपाईचे सौजन्य टिळक रोडवरील ला-बाईक यांनी दिले. या बुकमार्कचे प्रकाशन सोमवार, ता. १० फेब्रुवारी रोजी सकाळचे व्यवस्थापकीय संपादक प्रतापराव पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी लाबाईकचे पार्टनर महेश श्रोत्री, निर्धारच्या व्यवस्थापकीय विश्वस्त शीला पद्‌मनाभन व मृद्‌गंधचे मंदार लवाटे, सुनील पिंपळखरे उपस्थित होते.

**ग्रामीण कथालेखक प्रशांत पोखरकर यांचे निधन**

ग्रामीण कथा लेखक, कादंबरीकार प्रशांत पोखरकर (वय ३५) यांचे सोमवारी पहाटे रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे व मुलगी असा परिवार आहे. आंबळे गावावरून पुण्याकडे येत असताना त्यांच्या मोटारसायकलला एका रुग्णवाहिकेने जोरदार धडक दिली होती. 'पराभूत माणसं' हा कथासंग्रह, तर रस्तय, विषारी नागीण, मग मी कोण?, ब्लॅक टायगर, गाव ढासळत आहे या त्यांच्या कादंबऱ्या गाजलेल्या आहेत.

**मुंबई विद्यापीठास नाना शंकरशेठ यांचे नाव द्यावे - मनोहर जोशी**

मुंबई विद्यापीठाला जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेठ यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी लोकसभा अध्यक्ष मनोहर जोशी यांनी केली. 'प्रबोधन प्रकाशना'ने वांद्र्याच्या रंगशारदा सभागृहात नानांच्या २००व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. नानांचे चरित्र शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याची मागणी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी केली होती. शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी या कार्यक्रमात शिवसेनाप्रमुखांच्या



या मागणीचा पुनरुच्चार केला. यावेळी झालेल्या विशेष कार्यक्रमात 'प्रबोधन प्रकाशन'च्या पुढाकाराने राजेश केतकर यांनी तयार केलेल्या नानांच्या आयुष्यावरील लघुपटाचे प्रकाशन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते तर टपाल खात्याने नानांच्या स्मृतीप्रीत्यर्थ प्रकाशित केलेल्या विशेष टपाल आवरणाचे प्रकाशन मनोहर जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. याशिवाय एका स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात आले. वसंत पोतदार यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे नानांच्या आयुष्याचा आढावा घेतला.

कार्यक्रमास महापौर महादेव देवळे, प्रबोधन प्रकाशनाचे विश्वस्त सुभाष देसाई, नाना शंकरशेठ यांच्या पिढीतील वंशज सुरेंद्र शंकरशेठ, मुख्य पोस्टमास्तर जनरल ए. पी. श्रीवास्तव उपस्थित होते.

**बाळशास्त्री जांभेकर यांच्यावरील टपाल तिकिटासाठी प्रयत्न : जोशी**

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचे टपाल तिकीट काढण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील, असे लोकसभेचे अध्यक्ष मनोहर जोशी यांनी सांगितले.

'महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी'तर्फे त्यांच्या हस्ते राज्यातील 'दर्पण पुरस्कार' देण्यात आले. उद्योगपती बी. जी. शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

श्री. जोशी म्हणाले, ''शोध पत्रकारिता ही काळाची गरज आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी वृत्तपत्रांनी मोठे बदल करणे अपेक्षित आहे.'' सर्वांगीण विकासासाठी प्रशासन, राजकारण व पत्रकारांनी एकत्र येण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

श्री. शिर्के म्हणाले, ''पोंभुर्ले (जि. सिंधुदुर्ग) येथे बांधण्यात येणाऱ्या दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मारकासाठी शिर्के उद्योगसमूहातर्फे मदत देण्यात येईल.''

'ज्येष्ठ संपादक पुरस्कार' मिळालेले विश्वासराव वाबळे, 'समाजचिंतन'चे संपादक श्री. घडवई यांनीही मनोगत व्यक्त केले. जांभेकर यांचे स्मारक लोकवर्गणीतून पूर्ण केले जाणार असल्याची माहिती यशवंत पाध्ये यांनी या वेळी दिली. महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे विश्वस्त रवींद्र बेडकीहाळ यांनी प्रास्ताविक केले. पत्रकार हरीश पाटणे यांनी सूत्रसंचालन केले

**महर्षी शिंदे यांचे समग्र साहित्य तीन खंडांत प्रसिद्ध होणार**

राज्य सरकारच्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे थोर समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे समग्र साहित्य तीन खंडांत प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेण्यात बाला आहे. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. रा. रं. बोराडे यांनी दिली.

पहिल्या खंडात महर्षी शिंदे यांचा 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा मौलिक संशोधनपर प्रबंध व त्यांचे अस्पृश्यताविषयक सर्व लेखन एकत्रित करण्यात येणार आहे. 'महर्षी शिंदे यांचे विचारधन' या दुसऱ्या खंडात त्यांचे सर्व सामाजिक, धर्मविषयक चिंतनपर लेखन; तसेच भाषा आणि इतिहासविषयक संशोधनपर लेखन समाविष्ट करण्यात येणार आहे.

तिसऱ्या खंडात महर्षी शिंदे यांचे आत्मचरित्र, रोजनिशी, प्रवासवर्णनपर लेख समाविष्ट करण्यात येणार आहेत. प्रत्येक खंड सुमारे आठशे पानांचा असणार आहे. दुर्मिळ व नव्याने उपलब्ध झालेले लेखन ही समाविष्ट करण्यात येणार आहे.

**लेखकांनी सामाजिक प्रश्नांपासून दूर जाऊ नये**

लेखकाच्या लेखनकृतीचे मूल्यमापन समाजाच्या संदर्भातच होते. त्यामुळे लेखकांना समाजाच्या प्रश्नांपासून दूर होता येणार नाही, अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक प्रा. रंगनाथ पठारे यांनी उंडाळे येथे व्यक्त केली.

श्री. पठारे यांच्या हस्ते १२ व्या समाजप्रबोधन साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन झाले, अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखिका विजया राजाध्यक्ष होत्या. स्वातंत्र्यसैनिक दादा उंडाळकर स्मारक समितीच्या वतीने हे संमेलन घेण्यात आले.

सामाजिक जबाबदारीबाबत मध्यमवर्गात मोठ्या प्रमाणात अनास्था दिसत आहे, अशी खंत व्यक्त करून श्री. पठारे म्हणाले, ''जागतिकीकरणामुळे जाणवणारी सर्वांत मोठी समस्या म्हणजे चंगळवाद. त्याबरोबरच स्वार्थभाव आणि सामाजिक उदासीनताही आली. गेल्या बारा वर्षांत प्रचंड वाढलेला मध्यमवर्ग समाजाच्या दु:खांविषयी उदासीनच असतो. आपण हिंदुस्थानी लोक अत्यंत सहिष्णू आहोत; परंतु आज आपण कोणत्या मानसिकतेतून जात आहोत? काही शक्ती देशात धर्माच्या नावावर उन्माद पसरवीत आहेत आणि आपण उदासीन आहोत.'' महाराष्ट्रात लेखकांना वाजवीपेक्षा जास्त प्रतिष्ठा दिली जाते, अशी टीका करून ते म्हणाले, ''लेखकाने सामान्य माणसासारखेच जगले पाहिजे. तो समाजापासून तुटला, लब्धप्रतिष्ठितासारखा चाकोरीत जगू लागला, तर त्याला काहीही लिहिता येणार नाही; मात्र त्याला समाजाच्या प्रश्नांविषयी नाराजीचा सूर उघडपणे व्यक्त करता आला पाहिजे. ज्या प्रकारचा धार्मिक, भावनिक उन्माद देशात पसरवला जात आहे, त्याच्या विरोधात तातडीने उभे राहण्याची गरज आहे. याबाबतीत आपण जर उदासीन राहिलो, तर आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर, दादा उंडाळकर यांचा वारसा सांगता येणार नाही.''

श्रीमती राजाध्यक्ष यांच्या हस्ते स्वातंत्र्यसैनिक उंडाळकर यांच्या पुतळ्याला हार घालण्यात आला. तेथूनच ग्रंथदिंडी निघाली. लेझीम, झांजपथक; तसेच धनगरी ढोलांच्या तालावर चाललेल्या दिंडी मध्ये प्रा. पठारे, ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास कुलकर्णी, प्रज्ञा लोखंडे, सुमती लांडे, डॉ. रा. गो. प्रभुणे, राज्य मराठी विकास संस्थेच्या माधुरी तळाशीकर, अ‍ॅड. उदयसिंह पाटील, रयत कारखान्याचे अध्यक्ष जयसिंगराव पाटील, अप्पासाहेब पानवळ आदी सहभागी झाले होते. राजाध्यक्ष यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले.

श्रीमती राजाध्यक्ष वाचनसंस्कृतीच्या महत्त्वविषयी विवेचन करताना त्या म्हणाल्या, जागतिकीकरणामुळे जशा अनेक संस्कृती नामशेष झाल्या, तशी आपलीही संस्कृती धोक्यात आहे. ती वाचविण्याचा एकच मार्ग म्हणजे आत्मसंस्कृती आणि ती बनविण्याचा मार्ग म्हणजे वाचनसंस्कृती, लेखनसंस्कृती.''

## एलकुंचवार यांना साहित्य अकादमी पुरस्कार

प्रसिद्ध नाटककार महेश एलकुंचवार यांना 'युगान्त' या नाटकाबद्दल १७ फेब्रुवारी रोजी साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्कार वितरण समारंभात एलकुंचवार यांच्यासह बावीस भारतीय भाषांमधील सर्वोत्कृष्ट साहित्यकृती विजेत्यांचा अकादमीचे अध्यक्ष गोपीचंद नारंग यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. उर्दू भाषेतील सर्वोत्कृष्ट साहित्याबद्दलचा पुरस्कार प्रसिद्ध कवी व लेखक गुलजार यांना त्यांच्या 'धुआँ' या कथासंग्रहाबद्दल व कोकणी भाषेतील सर्वोत्कृष्ट कृतीचा पुरस्कार श्रीमती



हेमा नाईक यांना 'भोगदंड' या कादंबरीबद्दल देण्यात आला. प्रख्यात लेखक ओ. एन. व्ही. कुरूप या समारंभाचे मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते.

श्री. कुरूप यांनी शब्दाचे महत्त्व प्रतिपादन केले आणि जगातील अन्याय, भेदभाव, शोषण, जातिवाद यांच्या विरुद्ध आपल्या शब्दांच्या साह्याने आवाज उठविण्याचे लेखकांना आवाहन केले. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांनंतरही आपण भारतीय खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य उपभोगत आहोत काय, अशी शंका त्यांनी व्यक्त केली आणि प्रेम व सहिष्णुतेच्या समान धाग्याने सर्व धर्मांना एकत्र आणणे ही लोकशाही देशाची जबाबदारी आहे यावर जोर दिला.

श्री. कुरूप यांनी जगातील प्रदूषण व जागतिकीकरणाचा उल्लेख केला व अमेरिकेचे नाव न घेता टीका केली. ते म्हणाले, ''बकासूर आणि लांडगा व कोकरू या केवळ दंतकथा नाहीत. आजच्या जगातही ते अस्तित्वात आहे. साऱ्या जगाची संपत्ती गिळंकृत करण्यासाठी ते हरप्रकारे प्रयत्न करीत आहेत. अशा वेळी कोकराचे रक्षण करणे ही लेखकांची चिंता असायला हवी व आपल्या लेखनातून ती त्यांनी दमदारपणे व्यक्त करायला हवी.''

## साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदी नारंग

साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदी उर्दू साहित्याचे ज्येष्ठ समीक्षक गोपीचंद नारंग यांची निवड करण्यात आली. या पदासाठी झालेल्या निवडणुकीत त्यांनी ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या ख्यातनाम बंगाली साहित्यिक आणि कार्यकर्त्या महाश्वेता देवी यांचा पराभव केला. पराकोटीच्या राजकीय मतभेदांमुळे ही निवडणूक गाजली. नारंग यांना ९४ पैकी ५६ मते मिळाली.

## हरिभाऊ मोटे विज्ञान पारितोषिक

हरिभाऊ मोटे विज्ञान पारितोषिक (२००३) उत्कृष्ट विज्ञान साधनासाठी आहे. या पारितोषिकासाठी व्यक्ती, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था अर्ज करू शकतात. अर्जाबरोबर शैक्षणिक साधनाची प्रतिकृती, वापरण्याची पद्धत, येणारा अंदाजे खर्च, याची उपयुक्तता आदी माहिती असावी. संपर्क : मराठी विज्ञान परिषद, विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव चुना भट्टी, मुंबई ४०० ०२२, दूरध्वनी : २५२२४७१४, २५२२६२६८

## जेजुरीला 'सोन्थायमर यांचे स्मारक

''मराठी संस्कृतीचे जर्मन अभ्यासक गुंथर सोन्थायमर यांचे स्मारक जेजुरीत उभारण्यात येणार असून, मराठी लोकसंस्कृतीविषयीची माहिती देणारे संग्रहालय तेथे करण्यात येईल,'' अशी माहिती ज्येष्ठ साहित्यिक दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी दिली. मात्र स्मारकासाठीची जमीन अद्याप ताब्यात मिळाली नसल्याची तक्रार त्यांनी केली.

''सोन्थायमर यांनी जेजुरीच्या खंडोबाचा विशेष अभ्यास केला होता. वाघ्या-मुरळी गात असलेल्या विविध पदांचे संकलन त्यांनी केले होते. या पदांचे एक तासाचे ध्वनिमुद्रण त्यांनी केले आहे. हे सारे, तसेच त्यांची विविध पुस्तके, लोकसंस्कृतीची ओळख करून देणाऱ्या वस्तू व इतर साधने या स्मारकात ठेवण्यात येतील,'' असे चित्रे यांनी सांगितले. यासाठी जेजुरी नगरपालिकेने जागा देण्याचा ठराव केला आहे. शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी त्यास मान्यता दिली. मात्र नंतर जमिनीची फाईल महसूल प्रशासनाकडे अडकून पडल्याने पुढील कार्यवाही झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

सोन्थायमर यांच्या चाहत्यांनी व मित्रांनी सोन्थायमर कल्चरल असोसिएशनची स्थापना केली असून, तिच्याद्वारे विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.

### पी. जी. वुडहाऊस यांच्या कलाकृतींना अनोखा उजाळा...

बर्टी वूस्टर आणि जीव्हजसारख्या पात्रांची निर्मिती करणारे प्रख्यात विनोदी इंग्लिश लेखक पी. जी. वुडहाऊस यांच्या कलाकृतींना उजाळा देणारा कार्यक्रम पार पडला.

ब्रिटिश लायब्ररीने 'वुडहाऊस दिना'चे आयोजन केले होते. वुडहाऊस यांचा जन्म, शालेय शिक्षण, डलविच येथील महाविद्यालयीन शिक्षण, लग्न, लेखन प्रवास अशा निरनिराळ्या टप्प्यांतून सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशनचा विद्यार्थी हर्षो चट्टोराज याने हा जीवनपट उलगडून दाखवला.

वुडहाऊस यांच्या जीवन व लेखनकार्यावर प्रश्नमंजूषाही घेण्यात आली. अरुंधती कोगेकर आणि आशिष कुलकर्णी यांनी त्यात यश मिळवले. वुडहाऊस "ह्या क्लबमध्ये वुडहाऊस यांच्या साहित्यावर चर्चा, त्यांच्या नाटकांचे वाचन, असे उपक्रम हाती घेण्यात येणार असून, वुडहाऊस समजून घेणे, हा या क्लबचा उद्देश आहे.'' ब्रिटिश लायब्ररीच्या व्यवस्थापक श्रीमती अनिल बक्षी यांनी प्रास्ताविक केले.

### शहरातील विद्यार्थी आणि ग्रामीण भागात वाचनसंस्कृती

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थी अनेकविध समाजोपयोगी उपक्रम हाती घेतात. जलसाक्षरता, व्यसनमुक्ती, एड्‌विषयक जागरुकता, रक्तदान शिबिरे आदींचा त्यामध्ये समावेश असतो. पौड रस्त्यावर मुळशीजवळील जवळगाव हे तसे पुण्यापासून जवळच, पण प्राथमिक सुविधांचा अभाव, निरक्षरता आदी समस्यांनी ग्रासलेले. गरवारे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संतोष घारे याच्या पुढाकाराने या गावी ग्रंथालय सुरू केले आहे. विद्यार्थ्यांनी जमा केलेली तीनशे पुस्तके त्यामध्ये आहेत.

लहान मुलांना गोष्टी वाचून दाखवून पुस्तकांची गोडी निर्माण करण्यात येते आहे. विद्यार्थ्यांनीच निधी जमवून वृत्तपत्रे, किशोरसारखी लहान मुलांची नियतकालिके आदींची वर्गणी भरली आहे. नवनवीन माहिती जाणून घेण्याची आवड असलेल्या ज्येष्ठ नागरिकांनाही पुस्तके वाचून दाखविण्यासाठी विद्यार्थी तत्पर राहतात, अशी माहिती उपप्राचार्या हेमा जोशी यांनी दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य सु. गो. पळसोदकर, पुणे विद्यापीठाच्या सेवा योजनेचे समन्वयक के. पी. बैरागी आदींच्या उपस्थितीत या ग्रंथालयाचे उद्‌घाटन केले गेले.

### संवेदनशीलतेला जाऊ लागलेला तडा ही राष्ट्रापुढील समस्या

'आज समाजातील कोणत्याही क्षेत्रावर नजर टाकली तर आपण अस्वस्थ होतो; कारण पुरुषांबरोबरच स्त्रियांना, शहरवासियांबरोबरच खेड्यातील लोकांना, उच्चवर्णीयांबरोबर दलिताना समान हक्क देणाऱ्या राज्यघटनेचा भंग होताना दिसतो. भारताच्या लोकांनीच या लोकांना 'जगण्याचा'समान अधिकार देऊनही त्यापाठोपाठ येणारी जबाबदारी आपण विसरल्याने हे घडते. 'ज्याप्रमाणे कुटुंबातील व्यक्ती रक्ताच्या नात्याने जोडलेल्या असतात त्याप्रमाणे राष्ट्रातील व्यक्ती 'संवेदने'ने जोडलेल्या असतात. आज ही संवेदना कमी होत चालल्यामुळेच राष्ट्रापुढील बेरोजगारी, दारिद्र्य, कुपोषण अशा समस्यांचा सामना करणे कठीण झाले आहे. मुख्य प्रश्न



सोडवण्याऐवजी लोकांची दिशाभूल करण्याच्या नेत्यांच्या धोरणामुळे आपला समाज पुढे जाऊ शकत नाही आणि हेही संवेदनशीलतेला तडा जात असल्याचेच उदाहरण आहे. 'महाराष्ट्र फाऊंडेशन समाजकार्य गौरव पुरस्काराचे मानकरी ही संवेदनशीलता राखण्याचे काम करत आहेत, म्हणूनच ते सन्मानास पात्र आहेत, अशा शब्दात डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी त्यांचा गौरव केला. १९९६ पासून महाराष्ट्र फाऊंडेशन व केशव गोरे स्मारक ट्रस्ट यांच्या वतीने दिला जाणारा समाजकार्य गौरव पुरस्कार यंदा 'डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्ट, मुंबई' या संस्थेला आणि भुरीवाई शेमाळे, नंदूरबार, रजिया सुलताना, अमरावती इस्वलकर, विवेक मॉटेरो, डॉ. राम पुनियानी (मुंबई) या सामाजिक कार्यकर्त्यांना देण्यात आला.

### फर्ग्युसनच्या ॲम्फी थिएटरमध्ये शेक्सपियरची नाटके

फर्ग्युसन महाविद्यालय आणि सृष्टी सांस्कृतिक आणि विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांनी 'शेक्सपीयरची दोन राजकीय नाटके' या विषयावर व्याख्यान दिले. 'ज्युलिअस सीझर' आणि 'रिचर्ड दि थर्ड' ही नाटके व जणू शेक्सपीयरच श्रोत्यांच्या भेटीला आणला.

सत्ता हेच निसर्गातील सर्वात मोठे उद्दिष्ट आहे, या मूलभूत गोष्टीसह शेक्सपीयरने तात्कालिकतेचे वर्णन करतानाचा आपल्या प्रतिभेने त्याला शाश्वतता प्राप्त करून दिली आहे आणि म्हणूनच आजही अनेकांना हॅम्लेटसारखे 'असावे की नसावे' वा 'टुबी ऑर नॉट टुबी' या द्विधावस्थेला सामोरे जावे लागते. रिचर्डची विधिनिषेधशून्यता व साऱ्या जगावरच सूड उगवल्याची भावनाही व्यक्त होताना शेक्सपीयरच्या प्रतिभेमुळे त्याच्या दुर्गुणांतील भव्यता आकर्षून घेते. सीझर, ॲन्टनी, ब्रूटस वा सर्व पात्रांच्या माध्यमातून शेक्सपीयर सनातन, शाश्वत मूल्ये, सत्तासंघर्ष तर प्रभावीपणे उभा करतोच; पण 'रोमन मॉब' या जनसमूहाच्या माध्यमातून सार्वत्रिक आढळणाऱ्या समाजवर्तनाचेही प्रत्ययकारी वर्णन करतो. एकीकडे विजयोत्सव साजरा करणारा समाज पायाखालीही घेतो, हे आजही आपल्याला दिसून येते व समाज तोच असला तरीही त्याचे वर्तन निराळे कसे होते, याचे शेक्सपीयरने केलेले वर्णन आजही म्हणूनच शाश्वत ठरते, असेही प्रा. प्रधान यांनी सांगितले.

### 'पुस्तके ही मानवाची सर्वोत्कृष्ट निर्मिती'

पुस्तके ही मानवाच्या हातून झालेली सर्वोत्कृष्ट निर्मिती आहे, असे प्रतिपादन ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त आसामी लेखिका इंदिरा गोस्वामी यांनी केले. अन्य भाषांतील चांगले साहित्य आपापल्या भाषांत भाषांतरित करून घेणे हा राष्ट्रीय एकात्मतेचा चांगला मार्ग असल्याचेही त्यांनी सांगितले 'आधालेखा दस्तावेज' या त्यांच्या आत्मचरित्रात्मक पुस्तकाचे मराठीत भाषांतर 'अर्धीमुर्धी कहाणी' या नावाने सोलापूरच्या सुविद्या प्रकाशनाने प्रकाशित केले आहे.

महाराष्ट्र आणि आसाम यांच्यात पूर्वीपासूनच जवळचे संबंध आहेत, असे सांगून त्या म्हणाल्या, ''आसाममध्ये शिवाजी महाराज आणि विजय तेंडुलकर खूपच लोकप्रिय आहेत. श्री. तेंडुलकर यांच्या 'सखाराम बाईंडर' या नाटकाच्या प्रयोगाला अद्यापही आसाममध्ये चांगली गर्दी होते.''

डॉ. विलास खोले यांनी गोस्वामी यांच्या लेखनाचा आढावा घेतला. पुस्तकाच्या

भाषांतरकार अर्चना मिरजकर यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली.

'साधना'तर्फे प्रा. प्रधान यांनी श्रीमती गोस्वामी यांचे स्वागत केले. प्रकाशक बाबूराव मैंदर्गीकर यांनी प्रास्ताविक केले.

### साहित्य संमेलनात साहित्यरुपी आत्मपूजनाची गरज

भाषा ही प्रत्येकाच्या मुखातच वास करीत असल्याने भाषेचा शोध घेण्याची गरज नाही. ती नैसर्गिक, उपजत अशी गोष्ट आहे. साहित्य ही स्वत:ची अभिव्यक्ती असल्याने साहित्य संमेलनात साहित्यिकाने एक प्रकारे आत्मपूजनच करणे अपेक्षित आहे असे ज्येष्ठ विचारवंत प्रा. शिवाजीराव भोसले यांनी सांगितले.

येळ्ळूर मराठी साहित्य संघाने आयोजित केलेल्या तिसऱ्या ग्रामीण साहित्य संमेलनात अध्यक्षपदावरून ते बोलत होते. या संमेलनाचे उद्घाटन उद्योजक सुरेश हुंदरे यांच्या हस्ते झाले. आपण स्वत: साहित्यिक नाही असे सांगून प्रा. भोसले म्हणाले की, साहित्य आणि विचार यांची सांगड घालून ते बोलीभाषेत लोकांपर्यंत पोहोचविण्याचा माझा प्रयत्न असतो. सीमाभागातील लोकांना मायबोलीतून हे विचार पोहचवणे हा एका वेगळ्याच आनंदाचा भाग आहे. गेली ४५ वर्षे महाराष्ट्रातील राजकारणी मंडळी सीमाप्रश्न सोडविण्याचे आश्वासन देत आहेत. पण, त्यांच्या हातून हा प्रश्न अजिबात सुटणार नाही हे आता स्पष्ट झाले आहे, सीमाप्रश्न सोडविण्यासाठी आता संत महात्म्यांनाच पुनर्जन्म घ्यावा लागेल असे ते म्हणाले.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात गडहिंग्लज येथील प्रा. शिवाजीराव भुकेले यांनी मृत्यूंजयकार शिवाजी सावंत 'व्यक्ती आणि साहित्य' हा विषय मांडला. उपेक्षित अंगराज कर्णाला कादंबरीचा नायक करून शिवाजी सावंत यांनी त्याच्या व्यक्तित्वाची एक अनोखी बाजू लोकांपुढे आणली, कर्णाच्या व्यक्तित्वाची झळाळी लोकांपर्यंत पोहोचविली. साहित्यिकांच्या गटबाजीत सामील न होता त्यांनी अजरामर अशी साहित्यकृती निर्माण केली असे ते म्हणाले.

इंद्रजित भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कवि संमेलनात त्यांनी शेतकरी जीवनावर आधारीत कविता सादर केल्या. विष्णू वाघ यांच्या, सीमाभागातील मराठी भाषकांचे दु:ख मांडणाऱ्या, 'माझे मराठीचीये आई' या कवितेला उपस्थितांची विशेष दाद मिळाली.

धुळे येथील रेखा मुंदडा यांनी रणजित देसाई यांची 'ताजमहल' आणि शिवाजी पाटील यांची 'दशक्रिया' ही कथा सादर केली.

### दूरचित्रवाणीचे आकर्षण रोखण्यासाठी पालकांच्या प्रयत्नांची गरज

ग्रंथांच्या शिदोरीची जागा दूरचित्रवाणी कधीही घेऊ शकणार नाही. त्यामुळे लहानपणीच मुलांमध्ये वाचनाची आवड रुजवून दूरचित्रवाणी वाहित्यांचे अवाजवी आकर्षण रोखण्यासाठी पालकांनीच जागरूक प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिका सरिता पदकी यांनी केले.

रावसाहेब पटवर्धन यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने पटवर्धन स्मारक समितीच्यावतीने नगर येथे बालकुमार साहित्य जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन श्रीमती पदकी यांच्या हस्ते झाले. पाटबंधारे राज्यमंत्री बाळासाहेब थोरात, दत्ता टोळ, समीक्षक शंकर सारडा, अस्थिरोगज्ज्ञ डॉ. के. एच. संचेती, म. वि. देवचके आदी उपस्थित होते.



यावेळी बोलताना श्रीमती पदकी म्हणाल्या की, मुलांचे आयुष्य पुस्तकेच घडवतील, दूरचित्रवाणी वाहिन्या नव्हे. मात्र, याबाबतची जाणीव त्यांना लहान वयातच करून द्यायला हवी. मुलांनी मनसोक्त पुस्तकांचे वाचन करावे अशा स्वरूपाची सुविधा त्यांच्या पालकांनी उपलब्ध करून द्यायला हवी. त्यासंदर्भात गेली दोन वर्षे नगरकरांतर्फे राबविला जाणारा बालसाहित्य जत्रेचा उपक्रम अभिनंदनीय आहे.

दत्ता टोळ यांनी मुलांना पुस्तकांच्या बरोबरीने वृत्तपत्र वाचनाची सवय लावून घेण्याचे आवाहन केले. या बालकुमार साहित्य जत्रेचा समारोप शंकर सारडा यांच्या हस्ते झाला. चांगले आकलन करण्याची क्षमता श्रवणाने प्राप्त होते त्यामुळे चांगल्या प्रकारे ऐकण्याची सवय कथाकथनाद्वारे लावणे आवश्यक आहे, ज्ञानाच्या वाढीसाठी सतत वाचन, मनन करण्याचे आवाहन त्यांनी केले. साहित्य जत्रेचे कार्याध्यक्ष आणि दैनिक लोकसत्ताचे शहर संपादक महादेव कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन संगीता जोशी, संध्या कुलकर्णी यांनी केले तर शिल्पा रसाळ यांनी आभार मानले.

### साहित्याला प्रादेशिकतेचे बंधन नसल्याबाबत एकमत

साहित्याला कोणत्याही प्रदेशाची हद्द बंदिस्त करू शकत नाही. खरे साहित्य कोणत्याही प्रादेशिक मर्यादेत अडकून न पडता वैश्विक स्वरूपाचे बनते. अस्मिता अर्थातच, आत्मभान अशा साहित्यातून जाणवते, असा सूर कोमसापच्या आठव्या मराठी साहित्य संमेलनात व्यक्त झाला.

'प्रादेशिक अस्मिता-साहित्य संस्कृतीला शाप की वरदान' या विषयावरील परिसंवादात बोलताना विविध वक्त्यांनी हाच सूर पकडला. न्या. राजाभाऊ गवांदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवादात सुरेश द्वादशीवार, म. द. हातकणंगलेकर, अनंत तोरो, प्रल्हाद वडेर आणि सचिन कांदोळकर यांनी भाग घेतला. साहित्याला कसलीही सरहद्द नसते, मग त्याला प्रादेशिकतेच्या परिमाणात कसे मोजता येईल असा सवाल न्या. गवांदे केला. जन्माबरोबर निगडित असलेल्या निष्ठांचा वृथा गर्व करण्याऐवजी न्याय, बंधूता, नीतिमत्ता अशा मूल्यनिष्ठांचा अभिमान बाळगला पाहिजे. उलट दुहेरी निष्ठा सांभाळण्याची अपयशी कसरत आपण करीत राहिल्याने साहित्यात मनुष्यधर्म वाढविण्यात आपण कमी पडलो, असे मत द्वादशीवार यांनी व्यक्त केले. साहित्य कोणत्याही प्रदेशात निर्माण होवो ते जर गाभ्याचा अनुभव देत असेल तर आपोआपच ते वैश्विक बनते, असे हातकणंगलेकर यांनी सांगितले. जगातील सर्व सकस साहित्या आपले मूळ शोधणारे असते. यातूनच आपणास अस्मितेचे भान येते, असे विचार डॉ. तोरो यांनी मांडले. प्रादेशिक अस्मितेमुळे माणसे कोशात जातात, गुंतून पडतात. वैश्विक परिमाण लाभताच हीच प्रादेशिकता व्यापक बनते, असे वडेर यांनी सांगितले तर, प्रादेशिक स्वरूपाचे लिखाण समजून घेण्यात आपण कमी पडतो, प्रादेशिक अस्मिताच याच्या आड येते की काय असा प्रश्न कांदोळकर यांनी केला.

'कोकणची वाङमयीन परंपरा : प्रादेशिक अंगाने' हा परिसंवाद पु. द. कडोलीकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. दुपारी अजय वैद्य आणि विष्णू वाघ यांनी विचारलेल्या प्रश्नांना आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत उत्तरे देत प्रभाकर पणशीकर यांनी प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम रंगविला. नारायण सुर्वे व विद्याधर भागवत यांच्या प्रमुखपदाखाली कविसंमेलने रंगली.

## ग्रंथालयाच्या प्रसारासाठी सिन्नरमध्ये अधिवेशन

ग्रंथालयाचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने १६ फेब्रुवारी रोजी सिन्नर येथील सार्वजनिक वाचनालयात नाशिक विभाग ग्रंथालय संघाचे अधिवेशन भरविण्यात आले होते.

अधिवेशनाचे उद्‌घाटन 'एक होता कार्व्हर' च्या लेखिका वीणा गवाणकर यांच्या हस्ते झाले, अध्यक्षस्थानी नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस व माजी खासदार डॉ. वसंत पवार हे होते. 'सार्वजनिक ग्रंथालयांपुढील आव्हाने' या विषयावर परिसंवाद झाला. सार्वजनिक ग्रंथालय कायद्यातील व नियमावलीतील तरतुदी बदलणे आवश्यक आहे का, या विषयावरही चर्चा झंली.अधिवेशनात प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष आमदार गंगाधर पटणे, राज्याचे ग्रंथालय संचालक मो. भु. मेश्राम, सहाय्यक ग्रंथालय संचालक म. वि. उरणे, खासदार उत्तम ढिकले, आमदार माणिक कोकाटे, माजी आमदार तुकाराम दिघोळे यांचा सहभाग होता.

## हिंदू-मुस्लिम दरीसाठी साहित्य कारणीभूत - रजिया पटेल

हिंदु-मुस्लिम समाजात दरी निर्माण करण्यास मराठी साहित्य मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे असा आरोप साहित्यिक रजिया पटेल यांनी वसई येथील 'साहित्य जल्लोष' मधील 'स्त्री : साहित्यातील आणि वास्तवातील' या परिसंवादात केला. त्या पुढे म्हणाल्या की, मुस्लिम समाजातील स्त्रीला साहित्यात कितपत जागा आहे याचा अभ्यास करताना असे दिसून आले की, मुस्लिम स्त्री ही पीडित, अत्याचाराने ग्रासलेली, दु:खी, कमकुवतच दाखविण्यात आली आहे आणि ती अशी दाखविताना पुरुषाला खलनायक म्हणून दाखविण्यात आले आहे. मुस्लिम स्त्रीची ही दुर्बलता जी मराठी साहित्यात दाखविण्यात येते ती केवळ मुस्लिम पुरुष खलनायक आहे हे दाखविण्यासाठीच. मराठी साहित्यात जेवढा जातीयवाद आहे तेवढा इतर कोणत्याही साहित्यात आढळून येत नाही. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच साहित्यिकांनी मुस्लिम स्त्रीचे मार्मिक वर्णन केले आहे.

जातीव्यवस्था, अस्पृश्यता, वर्णभेद याचं ओझ ज्या स्त्रीवर आहे ती स्त्री म्हणजे दलित स्त्री आणि यामागे एक संस्कृती संघर्ष आहे. डॉ. आंबेडकरांनी दलितांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली पण मराठी साहित्याने कधी दलित स्त्रीची दखल घेतली नाही अशी खंत उर्मिला पवार यांनी व्यक्त केली.

मेहेरुन्निसा दलवाई यांनी साहित्य क्षेत्रातील स्त्रियांनी वास्तव लक्षात घेऊन आपली वाटचाल सुरू ठेवावी असे आवाहन केले तर प्रा. अंजली दशपुत्रे यांनी 'चारचौघी' नाटकातील स्त्रीपात्रांच्या व्यक्तिरेखा उलगडून दाखवितानाच आणखी ५ वर्षांनी समाजव्यवस्था व त्यावेळच्या स्त्रीची भूमिका काय व कशी असेल हे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेधा हरपनकर यांनी, सूत्रसंचालन साधना डिसिल्व्हा यांनी केले. स्वागत रॉक कार्व्हालो यांनी तर आभार उमाकांत वाघ यांनी मानले.

## इतर भाषांतील प्रयोगांचा विचार व्हावा : पाटणकर

आपल्या आसपासच्या सर्व भाषांमध्ये परिवर्तन होत असते. त्या त्या भाषांमधील कोणत्या प्रेरणांतून प्रयोगशीलता स्पष्ट झाली, याबाबतचा विचार होणे आवश्यक आहे, असे



मत प्रा. वसंत पाटणकर यांनी सातारा येथे व्यक्त केले.


साहित्य अकादमी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी यांच्या वतीने दोन दिवसांची साहित्य चर्चा झाली. 'आधुनिक मराठी कवितेतील प्रयोगशीलता' या विषयावरील या चर्चासत्रात विविध वक्त्यांनी निबंध सादर केले. संकल्पना, परंपरा, काळाचे भान, जीवनदृष्टी या सर्वांचे भान हवे तरच प्रयोगशीलतेची मांडणी करता येईल, असे सांगून पाटणकर म्हणाले, ''या गोष्टी परस्परपूरक आहेत. प्रयोगातून कवितेची कल्पना विस्तारत गेली, तर तो प्रयोग महत्त्वाचा ठरेल.''

साहित्य अकादमीचे मराठी विभागाचे निमंत्रक नारायण सुर्वे यांचेही भाषण झाले. दिनकर झिंब्रे यांनी आभार मानले. प्रदीप देशपांडे (मुक्तछंद व उर्दू कवितेतील छंद) वासुदेव सावंत (मर्ढेकरांच्या समकालीन कवींची तंत्रे) रफीक मुल्ला (लघुनियतकालिकातील कवितांमधील प्रयोग) यांनी निबंध सादर केले. धम्मपाल रत्नाकर यांनी 'विद्रोही काव्यातील शैलीचे प्रयोग' व रणधीर शिंदे यांनी 'दलित कवितेची भाषा' या विषयावरचे निबंध सादर केले.

## अवयवांची छपाई !

प्रयोगशाळेत कृत्रिम अवयव तयार करणं, हे आता आपल्या अंगवळणी पडलंय; पण अजूनही गुंतागुंतीची रचना असलेले अवयव, विशेषत: वेगवेगळ्या अवयवांतल्या नलिका तयार करणं जरा अवघडच समजलं जातं. त्यावर उपाय म्हणून चक्क रचना बदललेल्या 'इंक जेट प्रिंटर्स'चा वापर करण्याची शक्कल काही संशोधकांनी लढवली आहे. अद्याप हे तंत्र बाल्यावस्थेत असल्याने काही प्राथमिक पेशी रचनांची 'छपाई' करण्याचं तंत्र विकसित झालं आहे. मात्र, या तंत्राने लवकरच संपूर्ण अवयव तयार करणं शक्य होईल, असा विश्वास या संशोधकांनी व्यक्त केला आहे.

या तंत्राने अवयवांची 'छपाई' करण्यासाठी सर्वसाधारणपणे 'थर्मोरिव्हर्सिबल जेल'चा वापर केला जातो. या जेलचं वैशिष्ट्यं असं, की ३२ अंश सेंटिग्रेडच्या वर तापमान असलं, की ती घनरूपात येते आणि २० अंश सेंटिग्रेडपेक्षा कमी तापमानाला ती द्रवरूप असते. शिवाय जैविक विघटनशील असल्याने तिच्यापासून पेशींना काही धोकाही संभवत नाही. एकमेकांशेजारी दाटीवाटीने बसविलेल्या एका स्वरूपाच्या पेशी आपोआप एकमेकींना जोडल्या जातात, या त्यांच्या गुणधर्माचा वापर करून इंक जेट प्रिंटरच्या साह्याने जेलमध्ये मिसळलेल्या पेशींचं द्रावण काचेच्या पृष्ठभागावर वेगवेगळ्या थरांमध्ये पसरण्यात येतं. विविधरंगी छपाईसाठी वेगवेगळी शाई भरून काही भागांत छपाई करणं आणि काही भाग कोरा सोडण्याचं तंत्र जसं वापरलं जातं, त्याच तंत्राचा उपयोग करून वेगवेगळ्या प्रकारच्या पेशींचे वेगवेगळे थर पसरले जातात. अनेक प्रयोगशाळांमध्ये सध्या डीएनएचे तुकडे, प्रथिने आणि अगदी पेशींची छपाईही या पद्धतीने केली जाते. पुढील काळात उतींचा (पेशी समूहांचा) वापर करून नलिकांसारख्या अवघड त्रिमित पेशीरचना निर्माण करणंही सोपं होऊ शकेल. गटनबर्गच्या छपाईयंत्राने ज्ञानाच्या क्षेत्रात जशी क्रांती घडवून आणली, तशी या छपाईतंत्रामुळे वैद्यक क्षेत्रात घडून येऊ शकेल, अशी आशा अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.




**पुस्तक परिचय**

# भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया

**संपादिका : नवाझ मोदी    अनु.: वासंती फडके**

**भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील सर्व स्तरांवरच्या महिलांचे लक्षवेधक योगदान अधोरेखित करणारा ग्रंथ**


१९९८ मध्ये मुंबई विद्यापीठातर्फे 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांची भूमिका' या विषयावर एक राष्ट्रीय परिसंवाद घेण्यात आला. त्यात चार सत्रात मिळून २० शोधनिबंध सादर करण्यात आले. त्यांच्या संकलनाचा मराठी अनुवाद सौ. वासंती फडके यांनी नीटनेटका केला आहे.

क्रांतिकारक स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, महात्मा गांधीप्रणित उपक्रमात कार्य करणाऱ्या स्त्रियांची भूमिका, अल्पसंख्याक स्त्रियांचे राष्ट्रीय चळवळीतील योगदान आणि परदेशी महिलांचे भारतीय स्वातंत्र्यचळवळीला योगदान असे या चार सत्रांचे विषय होते. बीजभाषण डॉ. य. दि. फडके यांनी केले.

या प्रत्येक सत्रातील मध्यवर्ती विषयाच्या अनुषंगाने काही प्रमुख कार्यकर्त्या स्त्रियांच्या कार्याची नोंद घेण्यात आली. येसूबाई सावरकर, कल्पना दत्त, चाफेकर बंधूंच्या बायका, अरुणा असफअली, कॅप्टन लक्ष्मी सेहगल यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान पहिल्या सत्रात विचारात घेण्यात आले. दुसऱ्या सत्रात महात्मा गांधीजींच्या सत्याग्रही आंदोलनात सहभागी झालेल्या मणीबेन नानावटी, मृदुला साराभाई, मणीबेन करा, कमलाबेन पटेल, अवंतिका गोखले, मिठूबेन पेटिट, यांच्या कामगिरीची वैशिष्ट्ये टिपण्यात आली. तिसऱ्या सत्रात पेरन कॅप्टन, तैयबजी कुटुंबातील स्त्रिया, व्हायोलेट अल्वा, ॲलिस अल्वारिस, शांताबाई भालेराव, रुक्मिणी राजभोज, सरस्वती घराडे, शांताबाई दाणी वगैरे अल्पसंख्य व दलित कार्यकर्त्या महिलांनी केलेल्या कार्याची माहिती देण्यात आली. मीराबेन, भगिनी निवेदिता, ॲनी बेझंट यांच्या योगदानाचा आढावा शेवटच्या सत्रात घेण्यात आला.

डॉ. ताराचंद आणि डॉ. रोमेशचंद्र मजुमदार यांनी लिहिलेल्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात स्त्रियांचे सर्वसामान्यत: नावानिशी उल्लेख आले असले तरी त्या बहुरंगी गर्दीत अनेक कार्यकर्त्या स्त्रिया या अनामिका आणि बिनचेहऱ्याच्या राहिल्या आहेत असा निष्कर्ष डॉ. य. दि. फडके यांनी बीजभाषणात काढला आहे. मजुमदारांच्या ९०० पृष्ठांच्या अखेरच्या खंडात २० पेक्षाही कमी स्त्री-स्वातंत्र्य सैनिकांचा उल्लेख आलेला आहे. वास्तवात हजारो स्त्रियांचा या आंदोलनात सहभाग होता आणि त्यापैकी हजारो स्त्रियांना कारावासातही जावे





## येसूबाई सावरकर यांनी पत्नी व भावजय या पारंपारिक भूमिका बजावताना गुप्त क्रांतिकार्याशीही समरसता साधली हे विशेष!


लागले होते. १९३० - ३७ दरम्यान तुरुंगात असणाऱ्या राजकीय कैद्यांचे अधिकृत आकडे उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ १९३२ च्या सविनय कायदेभंगाच्या दुसऱ्या मोहिमेत ७५००० व्यक्तींना तुरुंगात टाकण्यात आले; त्यात ३६३० महिला होत्या. म्हणून महिलांच्या सहभागाचे विहंगमावलोकन करून थांबण्याऐवजी त्यांच्या सहभागाचा सूक्ष्म अभ्यास करण्यास प्राधान्य देणे आवश्यक आहे असे डॉ. य. दि. फडके यांनी सुचवले आहे.

प्रस्तावनेमध्ये संपादिका नावाझ ब. मोदी यांनी परिसंवादातील विविध वक्त्यांच्या शोधनिबंधांचा परामर्श घेतला आहे. स्वातंत्र्य संग्रामातील स्त्रियांच्या सहभागाचा सर्वसमावेशक इतिहास लिहिला जाण्याची गरज आहे; त्यासाठी पुराभिलेखागाराप्रमाणेच गुप्त पोलिसांचे अहवाल, वर्गीकृत साहित्य, अप्रकाशित व्यक्तिगत साहित्य व रोजनिश्या, न्यायालयातील चौकशांचे अहवाल यांचा उपयोग केला गेला पाहिजे; या मताचा त्यांनी पुनरुच्चार केला आहे.

**सावरकर कुटुंबातील स्त्रिया**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे थोरले बंधू बाबाराव यांच्या पत्नी यशोदाबाई उर्फ येसूबाई सावरकर यांच्या विषयी उत्तरा सहस्त्रबुद्धे यांनी लिहिले आहे. रूढ अर्थाने येसूबाई या स्वातंत्र्यसैनिक नव्हत्या; परंतु ज्या कुटुंबात त्यांचा विवाह झाला त्या कुटुंबातील तिघे बंधू हे स्वातंत्र्याच्या चळवळीत होते. त्यांचे पती बाबाराव व दीर विनायकराव अंदमानात होते. धाकटे दीर नारायणराव हिंदुसभेचे नेतृत्व करीत होते. पत्नी व भावजय या पारंपरिक भूमिका बजावताना त्यांनी त्या तिघांच्या कार्याला पूरक अशा जबाबदाऱ्याही सहज भावाने पार पाडल्या. स्वदेशीचे आचरण व प्रचार, पोलिसांच्या जुलमाला धीरगंभीरपणे सामोरे जाणे आणि आत्मनिष्ठ युवती संघ या संघटनेतील सहभाग, तुरुंगात गेलेल्या अनेक तरुणांना माता-भगिनी या नात्याने दिलेला आधार - अशी कामे त्यांनी कर्तव्यबुद्धीने केली. अभिनव भारत संघटनेचे एक सदस्य बर्वे यांच्या घरी काही बॉंब लावलेले होते; पोलिसांची धाड त्यांच्यावर पडणार ही वार्ता कळताच येसूबाईंनी एका विश्वासू व्यक्तीला पाठवून ते बॉंब नष्ट करण्याचा इशारा दिला; अन्य कागदपत्रेही अन्यत्र हलवली...परंतु अन्यत्र अभिनव भारताच्या सदस्यांची नावे व पत्ते यांची वही सापडल्याने बाबाराव प्रभृतींवर नाशिक कट खटला भरण्यात आला. सावरकर बंधूंच्या गुप्त क्रांतिकार्याशी येसूबाई समरस झाल्या होत्या आणि त्यांच्या सर्व मसलतीला येसूबाईंनाही विश्वासाचे व आधाराचे पाठबळ होते हे स्पष्ट दिसते; म्हणून स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांचे योगदान लक्षात घेणे या परिसंवादाच्या आयोजकांना महत्त्वपूर्ण वाटले, ते योग्यच होय. हा शोधनिबंध स्वातंत्र्यवीरांचे धाकटे बंधू नारायणराव सावरकरांच्या नातीने लिहिला आहे; त्यामुळे त्याला आत्मीयताही लाभली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी येसूबाईंना उद्देशून लिहिलेली सांत्वन ही कविताही शेवटी दिली आहे.

"तू धैर्याची आससी मूर्ती। माझे वहिनी, माझे स्फूर्ति
राम सेवा व्रताची पूर्ति। ब्रीद तुझे आधीच



## तीन चाफेकर बंधू फासावर गेले; त्यानंतर त्यांच्या बायकांना सामाजिक बहिष्काराला तोंड देत मोठ्या धैर्याने वाटचाल करणे भाग पडले

महत्कार्याचे कंकण धरिले। आता महत्तमत्व पाहिजे बाणले
ऐसे वर्तन पाहिजे केले। की जे पसंत पडले संतांना''
अनेक पूर्वज ऋषीश्वर। अजात वंशजाचे संभार
साधुसाधु गर्जतील। ऐसे वर्तणे या काला।


**चाफेकर बंधूंच्या बायकांचे अग्निदिव्य**

पुण्यातील प्लेग कमिशनर सर चार्लस रँड यांचा १८९७ साली दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव या तिघा चाफेकर बंधूंनी खून केला. त्याबद्दल त्यांना फासावर लटकवण्यात आले. (१८९८) या तिघांच्या मागे त्यांच्या कुटुंबियांना अनंत हालअपेष्टांचा सामना करावा लागला. सामाजिक बहिष्कारही सहन करावा लागला. त्यांनी निमूटपणे प्राप्त परिस्थितीला तोंड दिले. बाळकृष्ण चापेकरांच्या पणतसून अनुया राजीव चापेकर यांनी या जुन्या काळातील आठवणींद्वारे या कुटुंबाची झालेली घुसमट प्रकट केली आहे. तिघा मुलांना फाशी दिल्यावर बसलेल्या धक्क्याने आईवडीलही वारले. २४ वर्षे वयाच्या दुर्गाबाईंवर (दामोदरपंतांच्या पत्नी) कुटुंबाची जबाबदारी पडली. यमुनाबाई बाळकृष्ण चापेकरांना त्यांच्या दोन मुलांसह गणेशपंत चापेकर चिंचवडला घेऊन गेले. **दुर्गाबाई कितीतरी वर्षे घराच्या उंबरठ्याबाहेर पडल्या नाहीत. 'पांढऱ्या पायाची' म्हणून सर्वजण त्यांना हिणवत. यमुनाबाईंच्या अत्यंसंस्काराला जवळचे आप्तही आले नाहीत.** स्वातंत्र्योत्तर काळात चाफेकरांचा सन्मान झाला; पण तो १९९७ मध्ये रँड हत्येच्या शताब्दीच्या निमित्ताने.

**अवंतिकाबाई गोखले**

अवंतिकाबाई गोखले १९१६ साली महात्मा गांधीजींच्या संपर्कात आल्या. त्यांचे पती बबनराव हे इंजिनियर होते. इंग्लंडमध्ये परिचारिकांचे समाजोपयोगी काम पाहून त्यांनी आपल्या पत्नीला नर्सिंगचे शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले. तो अभ्यासक्रम प्रथम श्रेणीत पूर्ण करून (१९०१) देवीच्या साथीत अवंतिकाबाईंनी रुग्णांची आहोरात्र सेवा केली. बबनरावांनी बडोद्याजवळ आगपेट्यांचा कारखाना काढला. त्यात त्यांच्या हाताचा तळवा स्फोटकामुळे उडाला. तेव्हा अवंतिकाबाईंनी कारखान्याचे व्यवस्थापन कुशलतेने हाताळले. ते पाहून बडोद्याचे सयाजीराव महाराज हेही आश्चर्यचकित झाले. १९१३ मध्ये इचलकरंजीच्या राणीसाहेबांबरोबर अवंतिकाबाईंना विलायतची वारी करण्याची संधी लाभली. इस्पितळे, बालवाड्या व स्वयंसेवी संघटना यामुळे त्यांच्या समाजसेवाकार्याबद्दलच्या कल्पना व्यापक झाल्या. परळमधल्या कामगारांमध्ये आणि अस्पृश्यांमध्ये काम करण्यास त्यांनी गोपाळकृष्ण देवधरांच्या प्रेरणेने आरंभ केला. लखनौ काँग्रेस अधिवेशनात महात्मा गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाने त्या प्रभावित झाल्या. बिहार मधील चंपारण्यातील आंदोलनामध्ये त्यांनी गांधीजींबरोबर भाग घेतला. त्याचवेळी **गांधीजींचे चरित्र त्यांनी मराठीत लिहिले. त्याला लोकमान्य टिळकांची प्रस्तावना होती. मराठीतील ते**





## अवंतिकाबाई गोखले या महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाने प्रभावित झाल्या. महात्माजींचे चरित्र मराठीत लिहिणाऱ्या त्या पहिल्या चरित्रकार आहेत

**पहिले गांधी चरित्र होय.** पुढे १९१८ मध्ये गांधीजींनी हिंद महिला समाजाची स्थापना केली. त्या कामात अवंतिकाबाईंनी खूप रस घेतला. १९२४ मध्ये त्या मुंबई महापालिकेत नगरसेविका म्हणून निवडून आल्या. १९३० च्या सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला. त्यांना ६ महिने कैद व ४०० रुपये दंड झाला. १९३९-४९ या काळातही त्या विविध सामाजिक कार्यात अग्रेसर होत्या. महात्माजींच्या निधनाचा धक्का त्यांना उद्ध्वस्त करणारा ठरला. चंपारण्यातील कार्य, सविनय कायदेभंग आणि हिंद महिला समाज या द्वारे त्या भारतीय प्रबोधनपर्वाच्या प्रतीक बनल्या. महात्मा गांधीजींच्या राजकीय तत्त्वप्रणालीचा व व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्यांच्यावर अखेरपर्यंत होता; आणि त्यामुळे त्यांच्या कार्यकर्तृत्वात अचाट परिवर्तन घडले.

गोवामुक्तीसंग्रामात सुधाताई जोशी आणि सिंधू देशपांडे या अग्रभागी राहिल्या.


चितागांग शस्त्रागार लुटण्यासाठी तुरुंगाच्या भिंती फोडणारी वीरांगना म्हणून कल्पना दत्त यांचे नाव सर्वतोमुखी झाले. क्रांतिकारी कार्य करणे ही पुरुषांची मिरासदारी नाही हे त्यांनी दाखवून दिले. ॲसिड शोषून घेतलेल्या कापडाचे स्फोटक बॉंब बनवण्याची कला त्यांना अवगत होती; त्यातून सुरुंग स्फोट खटल्यात त्यांना शिक्षा झाली. कल्पना दत्त यांनी आपल्या आठवणी लिहिल्यामुळे अनेक स्त्रीक्रांतिकारकांची नावे उजेडात आली. स्वातंत्र्योत्तर काळात सत्ता व प्रसिद्धी यापासून दूर राहिल्या. कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते प्रकाशचंद्र जोशी यांच्याशी विवाह केला. १९५१ मध्ये त्यांची पक्षातून हकालपट्टी केली गेली. नंतर पुन्हा त्यांना कम्युनिस्ट पक्षाने सदस्य करून घेतले. १९९५ मध्ये त्यांचे निधन झाले.

-मुस्लिम समाजातील स्त्रियाही या आंदोलनात सहभागी झाल्या. तैयबजी कुटुंबातील स्त्रिया या लेखाद्वारे त्यावर प्रकाश पडतो. रेहाना तैयबजी या गांधीवादी होत्या. साबरमती आश्रमाला त्यांनी आपले जीवन वाहिले. पारशी महिलांचेही स्वातंत्र्य चळवळीत लक्षणीय योगदान होते. मिठूबेन पेटिट, मणीबेन कारा यांचा निर्देश अटळ आहे. प्रॉटेस्टंट व्हायोलेट अल्वा आणि कॅथलिक ॲलिस अल्वारिस यांच्या कार्याचा क्रांती के. फरायाज यांनी आढावा घेतला आहे.

ॲनी बेझंट, मीराबेन आणि भगिनी निवेदिता या परदेशी महिलांनी भारताशी नाते जोडले. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रभावाने त्यांना भारताबद्दल जवळीक वाटली. महात्मा गांधीजींच्या आंदोलनांचा, विचारांचा व व्यक्तिमत्त्वाचा अनेक महिलांवर प्रभाव पडला. त्यामुळे त्यांना राजकारणात प्रवेश करण्यात अवसर मिळाला. त्यांचा आत्मविश्वास वाढला. समाजाची महिलांकडे पाहण्याची दृष्टी बदलली.

या पुस्तकामुळे आपल्यापुढे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा सहभाग ठसठशीतपणे उभा राहील. त्यांच्या कार्याला अनेक पदर होते हे लक्षात येईल. स्त्रियांच्या सबलीकरणाच्या प्रक्रियेत या आंदोलनपर्वाला मोठे स्थान द्यावे लागेल.

**पृष्ठे : ३५४ किंमत : ३०० रु. सभासदांना : २२५ रु. पोस्टेज : २५ रु.**



# सुवर्णकण

## वि. स. खांडेकर

**काव्य, टीका व तत्त्वज्ञान यांचा अनोखा संगम साधणाऱ्या खलिल जिब्रानच्या आशयघन रूपककथा**


१९३८ साली वि. स. खांडेकर यांना खलिल जिब्रानचे मॅडमन हे रूपककथांचे व कवितांचे पुस्तक पहिल्यांदा वाचायला मिळाले आणि त्या कथाकवितांनी त्यांना झपाटून टाकले. जिब्रानच्या या पुस्तकाने त्यांच्या मनाला एक प्रकारची गूढ पण रम्य अशी शांती लाभली. त्याच्या कथांतील तरल सौंदर्याने ते चक्रावून गेले. या गूढ सौंदर्याचा आत्मा त्यातील काव्यात आहे की तत्त्वज्ञानात असा प्रश्न त्यांना पडला. मॅडमन हे त्यांच्या आवडत्या पुस्तकांमध्ये विराजमान झाले. त्यातील रूपककथा आपल्याकडे येणाऱ्या मित्रसुहृदांना ऐकवणे आणि त्यावर भाष्य करणे. याचे वेडंच जणू खांडेकरांना लागले. त्या मित्रसुहृदांच्या प्रतिक्रिया काय होतात, याचे विश्लेषणही ते करू लागले.

कोणाला या रूपककथांतील उत्तुंग कल्पकता मोहिनी घालते, कोणाला त्याच्या मार्मिक उपरोधाने गुदगुल्या होतात, कोणाला त्यातील सूचक तत्त्वज्ञानात नव्या प्रकाशाचे दर्शन होते, असे त्यांना दिसून आले आणि या छोट्या गोष्टी लिहिणाऱ्या लेखकाची प्रतिभा फार मोठी आहे हे खांडेकरांचे मत अधिकाधिक दृढ होत गेले.

१९४१ साली सोलापूर साहित्य संमेलनात आपले छापील अध्यक्षीय भाषण काहीसे बाजूला ठेवून खांडेकरांनी जिब्रानची महासागर ही कथा सांगितली. ''समुद्रावर स्नान करण्यासाठी गेलेल्या लेखकाच्या आत्म्याला नैराश्यवादी, आशावादी, हळव्या मनाचा भूतदयावादी, गूढ आध्यात्मवादी, वास्तववादी, पावित्र्यवादी, अशी माणसे दिसतात; त्यापैकी कोणाच्याही उपस्थितीत त्या आत्म्याला स्नान करण्याएवढा एकान्त वा शांत निवान्तपणा जाणवत नाही, आपला उघडा देह इथल्या वाऱ्याच्या वा प्रकाशाच्या संपर्कात येऊ नये असे त्या आत्म्याला वाटते आणि तो समुद्र मागे टाकून महासागराचा शोध घेण्यासाठी पाऊल टाकतो; अशा आशयाची कथा सांगून खांडेकरांनी तिच्यावर भाष्य केले,

''मेलेले मासे हळुवारपणे परत पाण्यात सोडणारा हा भूतदयावादी - खांडेकरांच्या वाङ्मयाचा प्रतिनिधीच नाही का ? रत्नजडित पेटीतून चिमचिमटीने समुद्रात साखर टाकून त्याला मधुरता आणू पाहणारा हा आशावादी, अत्रे आणि फडके यांच्या वाङ्मयाचे यथार्थ चित्र






## रूपककथा या वाङ्मयप्रकाराचे सामर्थ्य सूचकतेने पण अचूक रीतीने केलेल्या सत्यदर्शनात आहे

नाही असे कोण म्हणेल ? स्वत:च्या सावलीची वाळूत रेखाटलेली आकृती प्रचंड लाटा पुन:पुन्हा पुसून टाकत असताना ती गिरवीत असणारा गूढवादी - वामनराव जोशी यांच्या वाङ्मयाशी याचे थोडेफार साम्य आहे, नाही का ? आणि अगदी एकान्तात बसून आपल्या दगडी कमंडलूत समुद्राचा फेस साठवू पाहणारा हा ध्येयवादी ! साने गुरुजींची हटकून आठवण... झाल्याशिवाय राहत नाही.''

या भाषणातील जिब्रानच्या उल्लेखांमुळे सर्वसामान्य मराठी वाचकांमध्ये जिब्रानच्या रूपककथांबद्दल कुतूहल निर्माण झाले. रूपककथा या वाङ्मयप्रकाराबद्दलही आकर्षणाची नवी लाट आली. 'मौज' मध्ये खांडेकरांनी जिब्रानच्या रूपककथांचे अनुवाद देण्यास आरंभ केला. 'पॅरेबल्स' याला समानार्थी म्हणून रूपककथा हा शब्द खांडेकरांनी रूढ केला. अन्योक्तिकथा, दृष्टान्तकथा, प्रतीककथा, उपमाकथा, उत्प्रेक्षाकथा इत्यादी नावे मागे पडत गेली. काळ, विषय, मांडणी इत्यादी दृष्टींनी अत्यंत भिन्न असलेल्या अशा रूपककथांची इसापपासून जिब्रानपर्यंतच्या प्रतिभावंतांनी निर्मिती करून , हा चिमुकला पण चटकदार प्रकार लोकप्रिय केला. **'या प्रकारच्या कथांचे सामर्थ्य सूचकतेने पण अचूक रीतीने केलेल्या सत्यदर्शनात आहे. जगातल्या दंभाचे आणि स्वार्थाचे अगणित मुखवटे हलक्या हाताने दूर करण्याकरिता रूपककथा आपल्या तोंडावरही एक सुंदर मुखवटा चढवून वावरते असे खांडेकरांना जाणवले.**

खांडेकरांनी जिब्रानच्या 'मॅडमन'चा अनुवाद केला; त्यातील प्रत्येक रूपककथेवर व कवितेवर भाष्य करणाऱ्या मजकुराची त्याला जोड दिली. १९४४ मध्ये त्याचे 'सुवर्णकण' या नावाने पुस्तक निघाले. त्याचे मराठी वाचकांनी उत्साहाने स्वागत केले. अनेक लेखकांनी त्या रूपककथांचे अनुकरण केले. रूपककथांची एक लाटच आली. रूपककथा पानपूरकासारख्या सवंगपणे छापल्या जाऊ लागल्या. जिब्रानच्या रूपककथा म्हणजे काव्य, टीका, तत्त्वज्ञान यांचा संगम... गूढ सघन आशय...तरल सौंदर्य. जीवनविषयक प्रगल्भ विशाल दृष्टिकोन. मानवाची आत्मपूजा आणि आत्मवंचना, मुत्सद्यांचे मुखवटे, पंडितांचे पोकळ पांडित्य, धार्मिकांचे तकलुपी पावित्र्य हे सर्व जिब्रानच्या टीकेचे विषय... **उत्तुंग कल्पकता, उत्कृष्ट उपरोध आणि तत्त्वज्ञान हे मनुष्यासाठी आहे, तत्त्वज्ञानासाठी मनुष्य नाही ही जाणीव - या तीन असामान्य गुणांचा जिब्रानमध्ये समन्वय झालेला होता.** त्यामुळे त्याच्या रूपककथांना जी अर्थवत्ता प्राप्त झाली आहे, ती विलक्षण आहे. त्याची सर अर्थातच आपल्या पानपूरक थाटातल्या तथाकथित रूपककथांना येणे शक्य नव्हते. परंतु ती लाट मात्र एकेकाळी प्रचंड होती हे खरे !

'सुवर्णकण' मधील रूपककथा चारसहा ओळींपासून तीनचार पृष्ठांच्या आहेत. विस्तार



## खलिल जिब्रानच्या रूपककथा म्हणजे काव्य, टीका, तत्त्वज्ञान आणि जीवनभाष्य यांचा प्रगल्भ संगम

कितीही कमी वा जास्त असला तरी मार्मिक आशय आणि मर्मभेदक भाष्य यांत उणेपणा येत नाही. उदाहरणार्थ, कोल्हा ही रूपककथा घ्या.

*सूर्य नुकताच उगवला होता*
*आपल्या लांबलचक सावलीकडे बघून कोल्हा म्हणाला,*
*''आज उंट मिळायला हवा. त्याशिवाय आपली भूक भागणार नाही.''*
*सगळी सकाळ उंटाचा शोध घेण्यात सरली.*
*दुपार झाली. कोल्ह्याचे लक्ष आपल्या सावलीकडे गेले.*
*''एखादा उंदीर मिळाला तरी चालेल म्हणा!''*

आयुष्याच्या आरंभी, तरुणवयात आपण स्वत:बद्दल भ्रामक कल्पना करून घेत खूप भव्यदिव्य वल्गना करीत असतो; पण वास्तवाचे चटके बसल्यावर प्रौढ वयात आपण जमिनीवर आदळतो. सूर्योदयाच्या वेळची लांबलचक सावली बघून मोठेपणाचा भ्रम होतो, तो दुपारची टीचभर सावली बघून नाहीसा होतो, आणि उंटाची भूक उंदरावरही भागू शकेल असे वास्तव जाणवते. सामान्य माणसाच्या आत्मवंचनेचे कोल्हा हे येथे प्रतीक ठरते.

...असे अनेक व्यामिश्र अन्वयार्थ या रूपककथांद्वारे आपल्या कल्पनेला खाद्य पुरवतात. आपल्या बौद्धिक अहंकाराला डिवचत राहतात.

डोळा ही दुसरी रूपककथा घ्या.

*डोळा म्हणतो, ''अहाहा! किती सुंदर आहे हा समोरचा डोंगर!*
*निळ्या धुक्याचं वस्त्र किती खुलून दिसतंय त्याला !''*

*कान त्यावर प्रश्न करतो.''डोंगर? कुठंय डोंगर? मला तर त्याचा आवाज येत नाही मुळीच!''*


*हात म्हणतो,''डोळ्या, काय लेका थापा मारतोस? तुझा तो डोंगर त्याचा स्पर्श मला कसा जाणवत नाही?''*

*नाक मुरडून म्हणते, ''डोंगर नाहीच मुळी! असता तर मला त्याचा वास आला नसता का?*

*कान, नाक, हात - तिघांचे एकमत झाले,''ह्या डोळ्याचे काहीतरी बिघडलेय. भ्रम झालाय त्याला. नाही नाही ते दिसू लागलेय बिचाऱ्याला!''*

आपण सगळे स्वत:ला जे दिसते तेच तेवढे खरे मानत असतो. आपल्यापेक्षा इतरांना जे गवसते, ते खरे मानतोच असे नाही. वास्तवाची व्यामिश्रता आपण धुडकावून लावतो. अंशत:च बघूनही सर्व बघितल्याचा भ्रम बाळगतो. दुसऱ्याबद्दल तुच्छता बाळगतो. ...आणि बहुमताच्या जोरावर खऱ्याला खोटेही ठरवून मोकळे होतो. स्वत:च्याच प्रतीतीला प्रमाण मानून





## विशाल कल्पकतेमुळे जिब्रानच्या रूपककथांमधील गूढवाद रम्य-अद्‌भुत वाटतो; त्याची अल्पाक्षरी पण विविधार्थी शैली झपाटून टाकते

इतरांच्या प्रतीतीला विश्वासार्ह मानायचे नाकारतो. आपल्या आत्मप्रीतीमुळे आपल्या अनुभव विश्वाला मर्यादा पडतात.

असे कितीतरी अर्थ या छोट्याशा कथेतून आपल्यापुढे उभे ठाकतात.

*एक चेटकीण विहिरीत कसले तरी रसायन टाकते. जो त्या विहिरीचे पाणी प्राशन करील तो तत्काळ वेडा होईल असे ती म्हणते.*

*सर्व गावकरी त्या विहिरीचे पाणी पितात. फक्त राजा आणि प्रधान तेवढे पीत नाहीत.*

*सर्व शहरभर चौकाचौकात लोक जमून म्हणतात, ''आपल्या राजाला वेड लागलंय. प्रधानाचंही डोकं फिरलंय.'' त्यांना पदच्युत करायला हवं.''*

*तृषार्त राजा व प्रधान सुवर्णचषकातून त्या विहिरीचे पाणी आणून प्राशन करतात; आणि शहरात आनंदीआनंद पसरतो.*

*''राजा व प्रधान यांना सकाळपासून लागलेले वेड नाहीसे झाले.'' असे म्हणत गावकरी जल्लोष करतात.*

...आपले शहाणपण हे बहुसंख्य निर्बुद्धांच्या गर्दीत निरर्थक ठरते हे खलिल जिब्रान किती चपखलपणे सूचित करतो!

'मॅडमन' मध्ये काही काव्यरचनाही आहेत. त्याही रूपकात्मक आहेत. त्यांचा गद्यात्मक अनुवाद खांडेकरांनी केला आहे. या कविताही थोड्याफार गूढ आहेत. 'गूढ म्हणजे क्लिष्ट नव्हे, अर्थशून्य तर मुळीच नव्हे' असे खांडेकर बजावतात. विशाल कल्पकतेमुळे जिब्रानच्या गूढतेला अपूर्व रम्यतेची जोड मिळाली आहे. त्याची शैली अल्पाक्षरी पण विविधार्थी आहे. मानवी स्वभावाच्या चमत्कृतिपूर्ण छटा आणि वृत्तिप्रवृत्ती यांचे त्यात नाट्यपूर्ण दर्शन घडते; दांभिकपणावर या कथाकविता हल्ला चढवतात; परंतु सर्वसामान्यपणे माणसाच्या चांगुलपणावर, सत्प्रवृत्तीवर त्याचा अढळ विश्वासही दिसून येतो.

**पृष्ठे : १०७ किंमत : ८० रु. सभासदांना : ६० रु. पोस्टेज : २० रु.**






# सरत्या सरी

माणूसकीच्या गहिवरानं ओथंबलेल्या, संवेदनगर्भ कथा. खांडेकरांच्या असंकलित कथांचा अंतिम संग्रह.

**वि. स. खांडेकर**
**संपा. सुनीलकुमार लवटे**
**किंमत : ५०रु.**




## मानवगाथा : एक शोधनिबंध

**गो. मे. दळवी**


**या संपूर्ण सृष्टीत मानव हाच सर्वात प्रगत प्राणी आहे असे मानायचे का?**

आपण राहतो त्या पृथ्वीची उत्पत्ती साडेचार अब्ज वर्षांपूर्वी झाली. पृथ्वी ज्या सूर्यमंडलात आहे त्या सूर्यमंडलाची उत्पत्ती ज्या उर्जेपासून झाली ती त्याही आधी कोट्यवधी वर्षे असणार. या उर्जेचेच परिस्थितीप्रमाणे वेगवेगळ्या रूपात रूपांतर होऊन, अणूपरमाणू (न्यू ट्रॉन, इलेक्ट्रॉन, पोट्रान) ही द्रव्ये धरून आजचे आपले सूर्य, ग्रह, तारे तयार झाले. त्यांच्या अनेक आकाशगंगा तयार झाल्या. या उर्जेतून पृथ्वीसारख्या ग्रहावर न्यूट्रॉन, पोट्रॉन, इलेक्ट्रॉन, म्यूट्रॉन, सिस्ट्रॉन, रेकॉन वगैरे द्रव्यांमुळे अब्ज वर्षापूर्वी निर्जीव-सजीव सृष्टीची निर्मिती झाली. पृथ्वीला म्हणूनच काही शास्त्रज्ञ हे एक सजीव जिवाणू मानतात. आकाश, हवा, पृथ्वीवरील सजीव हे सारे या 'सजीव' पृथ्वीचे घटक आहेत. पृथ्वीवर जेव्हा जीव धरला तेव्हा तिचे तपमान २३ अंश सेंटिग्रेड होते आणि वातावरणात ९८टक्के कार्बनडायऑक्साइड होता. पहिल्या सजीवांनी त्या कार्बनडाय ऑक्साइडचा वापर करून ऑक्सिजन बाहेर सोडला. ज्वालामुखीतून बाहेर पडणाऱ्या काही वायूंमुळेही कार्बनडाय ऑक्साइड वापरला गेला. चार हिमयुगांमुळेही त्याचे प्रमाण घटले. आज हवेमध्ये २१ टक्के ऑक्सिजन आहे. हा ऑक्सिजन जर १७ टक्क्यांपर्यंत घटला तर पृथ्वीवरील सजीव सृष्टीचा पूर्ण संहार होईल; आणि २५ टक्के इतका वाढला तर सर्व वनस्पती उष्णतेने जळून खाक होतील.

असा अब्जावधी वर्षांचा भूतकाळ असलेल्या पृथ्वीवर माणूस प्राणी मात्र गेली आठ दहा हजार वर्षेच अस्तित्वात असल्याचा इतिहास उपलब्ध होतो.

पाषाणयुग, लोहयुग वगैरे पार करून, गेल्या दोन हजार वर्षात त्याने बरीच मजल मारली. रेनेसान्सनंतर विज्ञानाने नवी झेप घेऊन, या सृष्टीची रहस्ये समजावून घेण्यावर भर दिला. गेल्या शंभर दीडशे वर्षात त्याने जी प्रगती केली ती विस्मयकारक आहे. या प्रगतीचे स्वरूप जाणून घ्यायचे तर कोणते निकष लावावे लागतील? माणसाच्या मेंदूची उत्क्रांती, मन-प्राण-ज्ञान-स्वप्न-विचार यांची साधना, समूह जीवनाची-संस्कृतीची जडणघडण,काल व स्थल यावर मात करण्याचे त्याचे प्रयत्न व त्या प्रयत्नातील त्याचे कमी अधिक यश, अन्न मिळवण्याची त्याची क्षमता - असे काही निकष समोर ठेवून मानवी प्रगतीची कहाणी सांगता






## अब्जावधी वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या पृथ्वीवर माणसाची निर्मिती होऊन आठदहा हजार वर्षेच काय ती झाली असावीत!

येईल असे मनोमन ठरवून बेळगावचे एक अभ्यासक गो. मे. दळवी यांनी 'मानवगाथा - एक शोधनिबंध' हा लिहिण्याचा घाट घातला. अवघ्या २२० पृष्ठात एवढा मोठा पल्ला गाठणे ही एक कसरतच आहे. पण ती त्यांनी उत्तम प्रकारे करून दाखवलेली आहे; आणि या कसरतीमुळे वाचकही स्तिमित झाल्याशिवाय राहणार नाहीत. प्राचार्य हातकणंगलेकर यांनी उण्यापुऱ्या सात ओळीत या पुस्तकाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. ''हे पुस्तक म्हणजे **मानवाच्या या पृथ्वीतलावरील वास्तव्याचा आणि विश्वनिर्मितीचा वैज्ञानिक मागोवा आहे.** विषय फार मोठा... संक्षिप्त स्वरूपात मांडला आहे. सर्वसामान्य वाचकांना ही माहिती इतक्या सुसंगत प्रकारे आणि सुबोध शैलीत अन्यत्र मिळेल असे वाटत नाही... गाथा ही सर्वसामान्य भाविक जनांसाठीच असते... विज्ञानात रस घेणाऱ्या जिज्ञासूंच्या संग्रही ही मानवगाथा असणे अगत्याचे वाटते.''

गो. मे. दळवी यांनी यापूर्वीही गोमेद या नावाने महाभारतावर कादंबरी लिहिलेली आहे. या मानवगाथेमुळे त्यांच्या विचारव्यूहाकडे लक्ष जाईल आणि मानवी व्यवहाराचे एक सूत्रबद्ध अकलन होणे सुलभ ठरेल. या विवेचनातले अनेक तपशील नवे वा नवलपूर्ण वाटतील; अनेक थोरामोठ्यांचे आडाखेही कल्पनाशक्तीला खाद्य पुरवतील. वेळोवेळी आपण वाचलेले तपशील नव्या संदर्भात अधिक अर्थपूर्ण व आशयघन असल्याची प्रचीती येईल.

माणूस म्हणजे नेमके काय? आपण एक माणूस म्हणून जगतो तेव्हा आपले व्यवहार कुठल्या पातळीवर चालतात? त्यात कुठले घटक महत्त्वपूर्ण व लक्षवेधक ठरतात?

हे ब्रह्मांड, त्यातील आकाशगंगा, सूर्यमाला, त्यातील ग्रहमाला, त्यात पृथ्वीचे स्थान आणि पृथ्वीवरील सजीव सृष्टीची निर्मिती व वाटचाल - यांची पार्श्वभूमी ठाऊक असल्याशिवाय मानवगाथेचे यथार्थ आकलन असंभवच! त्यामुळे गोमेद यांनी प्रथम त्याबाबतची रूपरेखा मांडली आहे.

**ब्रह्मांडात मानव प्राणी सर्वश्रेष्ठ असल्याचा दावा करणे क्रमप्राप्त आहे. कारण पृथ्वीवरील जीवसृष्टीप्रमाणे इतर ग्रहांवर जीवसृष्टी असल्याचे अजून तरी आपल्याला आढळलेले नाही.**


मानवाच्या उत्क्रांतीचा आराखडा अनेक संशोधकांच्या परिश्रमांतून थोडाफार सुसंगतपणे मांडणे शक्य झाले आहे.

१. सात ते सहा कोटी वर्षांपूर्वी मानवाचे अस्तित्व होते

२. मानवाचा व मानवसदृश कपीचा (माकडांचा) समांतर अभ्यास केल्यास हे दोन्ही प्राणी वेगवेगळ्या निर्मितीचे आहेत असे मानावे लागते.

३. मानवी उत्क्रांतीचे तीन कालखंड पडतात.

(अ) ऑस्ट्रोलिपियेसीन - कपी मानव



# ब्रह्मांडात मानवप्राणी हाच सर्व श्रेष्ठ असल्याचा दावा करणे क्रमप्राप्त आहे त्याच्या उत्क्रांतीचे टप्पे विस्मयकारक आहेत

(आ) पिशीक्रॅथोपीन - प्रत्यक्ष मानव

(इ) सेपिअन - विचार करणारा मानव

४. अश्मयुगाच्या उत्तर पुराणकालात (इ.स.पूर्व २५ ते १० हजार वर्षे) 'होमोसेपियन' मानवाच्या क्रोमॅग्रन व कोम्लकापेल ब्रून या शाखा यूरोपात सर्वत्र पसरल्या. पश्चिम आशियातही ही मानवसंस्कृती सापडते. नैसर्गिक गुहांमध्ये वास्तव्य, गारगोटीच्या दगडांचा हत्यार म्हणून वापर यावेळी होऊ लागला.

५. नवअश्मयुग (इ.स.पूर्व दहा ते पाच हजार वर्षांचा काल)- पशुपालन, शेती, ग्रामरचना, गृहबांधणी, धातूंचा वापर, ही या काळातील मानवाची वैशिष्ट्ये.

६. ताम्रपाषाण व लोहयुगात मानव ज्ञानाने व बुद्धीने प्रगत होत गेला.

७. या पृथ्वीवर चारपाच ठिकाणी तरी मानवी जीवनिर्मिती स्वतंत्रपणे - एकाच कालखंडात - झाली असावी. आफ्रिका, चीन, अंदमान, ऑस्ट्रेलिया, उत्तर व वायव्य आशिया.


८. या मानवाने अन्न मिळवण्याचे वेगवेगळे मार्ग शोधून काढले. वनस्पती, शिकार, शेती, मासेमारी इ. (दोन लाख वर्षांपूर्वी अग्नीचा शोध मानवाला लागला. तो मानवाचा पहिला क्रांतिकारक शोध होय.) अग्नीत पडलेल्या मातीच्या गोळ्याला आलेला टणकपणा बघून मातीची भांडी बनवण्याची कला मानवाने आत्मसात केली. दगडावर दगड रचून शैलाश्रये म्हणजे घरे करण्याचेही तंत्र मानवाने विकसित केले.

**बोलभाषा आणि अक्षरलिपी**

९. निर्मितीच्या काळापासून मानव हा एकच प्राणी उत्क्रांत होत राहिलेला आहे. कपीमानवापासून आजच्या आधुनिक मानवापर्यंत उत्क्रांत होताना, कवटी, भावदर्शन, मेंदू यात बदल होत गेले. मानवाच्या आधी जन्मलेले अनेक प्राणी मात्र अद्याप आहेत त्या स्थितीत आहेत. मानवाला बोलता येऊ लागले, चित्रे काढता येऊ लागली, ज्ञानसंचय करण्याचे तंत्र आकळू लागले. भावभाषा, नादभाषा, चित्रभाषा, चित्रलिपी, बोलभाषा, अंक-संख्या संकेत भाषा, ब्राह्मी लिपी, - या द्वारे हे संपर्क - संज्ञापनक्षेत्र वाढत गेले. **मानवाला बोलभाषा व अक्षरलिपी सापडली आणि त्याची सांस्कृतिक क्षमता वाढत गेली.** मानवाला अन्य कोणा प्राण्याकडून वा अंतरिक्षातून आलेल्या कोणा देवांकडून ज्ञान मिळाले असे म्हणण्यापेक्षा बोलीभाषेद्वारे हा चमत्कार घडला असे मत गोमेद यांना जास्त श्रेयस्कर वाटते.

उत्क्रांतीच्या या टप्प्यात प्रथम भावभाषा व नादभाषा यांचा वापर करणारा कपीमानव येतो. दुसऱ्या मध्ययुगीन टप्प्यात चित्रभाषेमुळे व्यवहार साधणारा मानव, तर तिसऱ्या टप्प्यात बोलभाषेचा तो वापर करतो. आता संगणकीय भाषेमुळे अत्याधुनिक मानव संस्कृतीची निर्मिती होऊ शकेल.





# बोलभाषा व अक्षरलिपी सापडल्यानेच मानवाची सांस्कृतिक क्षमता वाढत गेली. वाचा केंद्र जागृती हा उत्क्रांतीचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

संस्कृती ही वैचारिक आचरणाची द्योतक असते; उत्क्रांती निसर्गाने बांधील असते असे सूत्र समोर ठेवून गोमेद संस्कृतीच्या विकासाचे टप्पे विशद करतात. काल, देश व परिस्थिती यानुसार ठिकठिकाणच्या सजीवांच्या आचरणात फरक पडतो; म्हणून सजीवांच्या सातत्याच्या वैचारिक भूमिकेतून प्रस्थापित होणाऱ्या सामूहिक आचरणाला संस्कृतीचे रूप लाभते. ही मानवी संस्कृती वृक्षवल्लरी, पशुपक्षी यांनाही सामावून घेते. (उदा. विशिष्ट मोसमात विशिष्ट वनस्पतींची लागवड, पूजा, सेवन, पशुपालन, पाळीव प्राणी यांना जीवनात स्थान).

मानवाची शारीरिक उत्क्रांती, ही जड उत्क्रांती तर वाचा केंद्र जागृती, हा जड उत्क्रांतीचा एक अंतिम टप्पा.

मानवाची चैतन्यमय उत्क्रांती ही त्याची वैचारिक उत्क्रांती.

निरीक्षण व चिंतन या दोन अंगांनी ही चैतन्यमय उत्क्रांती शक्य होते. वैचारिकता ही भाषेवर निर्भर; असे स्पष्ट करून गोमेद म्हणतात,''आहार, निद्रा, मैथुन, उत्सर्जन, श्वासोच्छ्वास, रूधिराभिसरण, संवेदना, मज्जा अभिसरण, चिन्मयशक्ती, अनुष्ठापन शक्ती, ज्ञानसंदर्भातील भावभाषा, नादभाषा, चित्रभाषा व बोलभाषा, चयापचय वाढ, झीज, जीवनप्रेम व मृत्युप्रेम या सर्व गुणावगुणांनी युक्त असा पृथ्वीतलावरील प्राणी म्हणजे मानव...**चिन्मयशक्ती ही मानव शरीरातील विविध पेशीसंचयांमध्ये सहकार घडवून आणून वैचारिक व बौद्धिक समतोलपणा राखते.''** मानव हा वरील सर्व गुणधर्मांनी बांधील आहे; त्यापलीकडे तो असू शकत नाही; असे गोमेद स्पष्ट करतात. (पृष्ठ ९१). आज मानव संस्कृती हा शब्द वापरताना धर्म, राष्ट्र, भाषा, प्रदेश, शिक्षण, अशा प्रकारच्या मानवी आचाराच्या मर्यादा घालून भेदाभेद केला जातो (पृष्ठ ८३).

व्यक्त ज्ञान, अव्यक्त ज्ञान, अज्ञान, नज्ञान हे ज्ञानाचे मुख्य प्रकार. भौतिक ज्ञान, राज्यशासन ज्ञान, अध्यात्मिक ज्ञान, राक्षसी ज्ञान (जादूटोणा इ.)

बौद्धिक चैतन्याच्या कल्पनेतून **सत्य कल्पना** (वैज्ञानिक शोध, गणित, कायदेकानू, भूगोल, संगीत, नृत्य, चित्र, वैद्यकीय संशोधन), **रंजक कल्पना** (कथा-कादंबरी-काव्य इ. ललित लेखन, पुराणे, आध्यात्मिक वाङ्मयाचा काही भाग,) आणि **सत्य व रंजक कल्पनांचा संकर अशा तीन प्रकारच्या कल्पनांचा आविष्कार होतो.** बौद्धिक चैतन्याच्या उत्क्रांतीनेच मानव पुढची प्रगती साधू शकतो. गोमेद यांच्या मते मानवाने दि. २० जुलै १९६९ रोजी चंद्रावर प्रथम पाऊल ठेवले - तो दिवस हा बौद्धिक चैतन्याची परिसीमा गाठण्याचा दिवस मानायला हवा. (१२७).

मानवी मेंदू हा एक चमत्कार आहे; आणि कोणत्याही घटनेमागील कार्यकारणभावाची संगती लावणे हे त्याचे एक वैशिष्ट्य आहे; आणि जिज्ञासा ही त्याची स्वाभाविक प्रेरणा आहे. आपल्याला जे आपले अस्तित्व जाणवते ते केवळ आपल्या मेंदूच्या प्रक्रियेमुळेच! म्हणून



## चंद्रावर मानवाने पाऊल ठेवले, तो दिवस म्हणजे मानवाच्या बौद्धिक चैतन्याची परिसीमा गाठणारा दिवस होय.

मानव समजून घ्यायचा असेल तर मेंदूच्या कार्याची व रचनेची माहिती करून घेणे महत्वाचे ठरेल असे गोमेद मानतात; त्यासाठी एका प्रकरणात मेंदू व जनुके यांच्या बद्दलच्या संशोधनाचा धावता आढावा घेण्यात आला आहे.

व्यक्ती म्हणून माणूस स्वत:चा वा दुसऱ्याचा विचार करतो तेव्हा तो काय करीत असतो?

गोमेद हे माणसाचा,'मी'चा विचार करताना **आध्यात्मिक मी, व्यावहारिक मी,** असे दोन भाग करतात. (१५४).

मानवाला बोलभाषा येईपर्यंत मानव 'व्यावहारिक मी'नेच वाटचाल करीत होता. बोलभाषा आल्यावर तो कल्पनाविलासात रमू लागला. आणि आत्मा - 'आध्यात्मिक मी'चा शोध घेण्यात तो रमू लागला. असे गोमेद मानतात.

'व्यावहारिक मी च्या आकृतिबंधात तरल जाणीव, भावना, व्यापक कल्पना, सारासार विचार, ज्ञान, समंजसपणा, नवीन ज्ञानाबद्दल जिज्ञासा, विनोद व खेळकरपणा यांचा समोवश होतो. स्वत:ची अस्मिता, स्वत:ची प्रतिमा याबरोबर स्वत:ची सामाजिक, कौटुंबिक प्रतिमा यांचेही प्रतिबिंब त्यात दिसते.

**मन ही संज्ञा देण्यासारखे केंद्र शरीरात अजून सापडलेले नाही.**

गो. मे. दळवी हे मन या संकल्पनेचीही छाननी करतात.

माणसाला मन आहे हेही सर्वजण गृहीत धरतात. मन म्हणजे काय किंवा मन म्हणजे अमुक गोष्ट असे दाखवणे कोणाला जमलेले नाही. भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञान, चैतन्यभाव, मनोभावविषय सिद्धान्त आणि मनोभावामुळे होणारे शारीर विकास यांच्या आधारे मनाबद्दल काही आडाखे मांडता येतात.

गोमेद यांच्या मते **जाणीव, संवेदना, स्मृती व विचार या चौभाषागुंठित क्रिया म्हणजे मन.** हा सिद्धान्त स्वीकारला तर मानवी जीवन सुखी करण्याची सूत्रे माणसाला गवसतील. मन ही संज्ञा देण्यासारखे एखादे केंद्र शरीरात कुठेतरी आहे असे सिद्ध करता आलेले नाही. आकलन शक्ती, स्मरणशक्ती, विचारशक्ती व भावना या सर्व प्रक्रिया मेंदू व मज्जासंस्था यांच्याशी निगडित आहेत असे गेल्या शंभरदीडशे वर्षातील संशोधनावरून दिसते. मोठ्या मेंदूच्या खाली असलेल्या लिंबिका तंत्र - थॅलॅमस क्षेत्रात सर्व भावनाप्रेरक केंद्रे आहेत. ही केंद्रे मोठ्या मेंदूशी जोडलेली आहेत. ही केंद्रे उत्तेजित झाली की मोठ्या मेंदूतून पसार होऊ पाहतात. पण मोठा मेंदू वाचाकेंद्राद्वारे त्या केंद्रांच्या उत्तेजितपणावर ताबा ठेवून व्यावहारिक भावना विष्काराला वाव देतो. मोठा मेंदू आणि भावक्षेत्रातील केंद्रे यांचा संबंध तुटला तर व्यक्ती भावनिक दृष्ट्या बेभान होते - असे विवेचन करून हिस्टेरिया, अकारण चिंता, औदासीन्य, संशयीपणा, चिडखोरपणा वगैरे लक्षणे ही भावक्षेत्र व मज्जापेशी यातील चिन्मय शक्तीच्या





## मानवी मेंदू हा एक चमत्कार आहे. आपल्याला जाणवणारे आपले अस्तित्व हे केवळ आपल्या मेंदूच्या प्रक्रियेमुळे!

बिघाडाची आहेत असे गोमेद प्रतिपादन करतात.

योग, प्राणायाम, ध्यान याद्वारे भावक्षेत्रातील व्याधी दूर होऊ शकतात. भावक्षेत्राची कार्ये भावभाषा, नादभाषा, चित्रभाषा व शब्दभाषा नियंत्रण हे व्यावहारिक मीच्या सुखी जीवनाला पायाभूत ठरते. (१८१).

प्राण, ज्ञान, स्वप्न आणि विचार याबद्दलही स्वतंत्र प्रकरणे या पुस्तकात आहेत. प्राणयुक्त सजीव अनुकूल परिस्थिती लाभली की आपल्यासारख्या सजीवाला जन्म देतो, शरीराची झीज भरून काढण्याचे काम जिवंत पेशी करतात. जड शरीराद्वारे आपले अस्तित्व दाखवत राहणे हा प्राणाचा तिसरा गुणधर्म. प्राण आहे तोवर जोर, ताकद, शक्ती दाखवता येते. प्राणामुळे सजीवात एक प्रकारचे तेज येते. तरीही प्राण म्हणजे काय - हे अजून समजलेले नाही. **प्राण म्हणजे ऊर्जा नाही, प्राण हे तत्त्व नव्हे, तर प्राण ही साधना होय;** अब्जावधी पेशीतील ही साधना शरीराची सर्व कार्ये परस्पर सहकार्याने सुरळीतपणे पार पाडत असते. भौतिक पदार्थाचे अणू आणि सजीवाच्या पेशी यांच्या संयोगाने अणूला प्राणमय स्वरूप प्राप्त होत असावे, पण ते नेमके कसे होते हे अजून मानवाला ज्ञात झालेले नाही. (१८६).

ज्ञान म्हणजे माहिती असे म्हटले तरी **ज्ञान व्हायला भावभाषा, नादभाषा, चित्रभाषा व शब्दभाषा यापैकी एक तरी भाषा सजीवाला यायला हवी.** या चारपैकी एखादी भाषा जरी अवगत नसली तर ती व्यक्ती ज्ञान मिळवण्याबाबत पंगूच राहते. उदा. मूकबधिरांना नादभाषा व शब्दभाषा येत नाही. अंधाला चित्रभाषा येत नाही.

**चौभाषांबाहेर ज्ञान नाही. चौभाषा काळ, परिस्थिती व स्थळ यानुरूप बदलतात.** चौभाषा व्यक्तिगत स्वतंत्र आहेत. त्यामुळे ज्ञानसुद्धा व्यक्तिगत व स्वतंत्र होते. ज्ञानही कायम रूपी नाही (१९४).

गोमेद हे शेवटी काय निष्कर्ष काढतात ?

विचार म्हणजेच जीवन आणि आनंदी विचार हेच आनंदी जीवनाचे ब्रीद होय.

आनंदी चौभाषा, आनंदी शब्द आनंदी विचार देतात. विचार करण्याची प्रक्रिया ही माणसाला लाभलेली सर्वात सुंदर गोष्ट आहे.

सुंदर विचार करणारा माणूस हा पूर्ण कलावंत होय.

दुसऱ्याला आनंदी करण्यासाठी जो वाचाकेंद्राचा उपयोग करतो तो सर्वांना प्रिय होतो. (२१९).

**पृष्ठे : २२८ किंमत : १६० रु. सभासदांना : १२० रु. पोस्टेज : २० रु.**

# वाचनालयांना आवाहन

आज वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळवण्याचे विविध मार्ग उपलब्ध झालेले आहेत. इंटरनेटच्या प्रसाराने हवी ती माहिती तयार मिळण्याचा 'रेडिमेड' मार्गही खुला आहे. त्यामुळे माहिती म्हणजेच ज्ञान व हे ज्ञान हवे तेव्हा मिळवता येते असा गैरसमज सर्वत्र प्रत्ययास येतो.

मानवी जीवन, मन, प्रगल्भ, आनंदी व विचारी होण्यासाठी वाचनाला आजही कोणताही पर्याय नाही. वाचनाने मानवी मनाची, बुद्धीची मशागत होते व व्यक्ती अधिक सृजनशील, क्रियाशील बनते. वाचनाचा सार्वत्रिक प्रसार झाला तर सारा समाजच प्रगत बनेल.

यासाठी आज वाचनसंस्कृतीची जोपासना करण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यात वाचनालयांनी फार मोठे योगदान देण्याची गरज आहे. वाचनसंस्कृतीची वाढ होण्यासाठी वाचनालयांतून उत्तम दर्जेदार पुस्तके वाचकांना उपलब्ध झाली पाहिजेत.

अशी पुस्तके कित्येक वाचनालयांतून आज उपलब्ध होत नाहीत.

जादा कमिशन मिळते म्हणून दर्जाहीन, पुस्तके वाचनालयांकडून खरेदी केली जातात आणि अशी पुस्तकेच गावोगावीच्या वाचकांना दिली जातात.


मनोरंजनाच्या भुलभुलैय्यात अडकलेल्या आजच्या युवापिढीला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व मनाला प्रगल्भ बनवणाऱ्या पुस्तकांचा प्रसार अधिकाधिक होणे गरजेचे आहे. यासाठीच सर्व वाचनालयांना आम्ही आवाहन करीत आहोत, फक्त उत्तमच पुस्तके घ्या आणि समाजाच्या बौद्धिक विकासाचे भागीदार बना. काही ज्येष्ठ नामवंतांनी नावाजलेल्या दर्जेदार पुस्तकांची माहिती आम्ही सादर करीत आहोत. प्रत्येक वाचनालयात ही पुस्तके असलेच पाहिजेत, असे आम्हाला वाटते. वाचनालयांनी ही पुस्तके घ्यावीत व आपले वाचनालय समृद्ध करावे ही अपेक्षा.



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

कोश

## पक्षीकोश




महाराष्ट्रातील सुमारे साडेपाचशे पक्ष्यांची नावांसह माहिती, त्यांची इंग्रजी, आंतरराष्ट्रीय आणि सुमारे सोळा भाषांतील नावे. तीनशे पेक्षा जास्त रेखाचित्रे. एकशे अठ्ठावीस रंगीत छायाचित्रांसह

लेखक : मारुती चितमपल्ली

किंमत : ८०० रु.

साहित्य प्रसार केंद्र नागपूर

## अध्यक्ष महोदय

भाषणे


मा. पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांची संसदेतील भाषणे.

संपादक : डॉ. ना. मा. घटाटे

मराठी अनु. : प्रा. अविनाश खंडकर


किंमत : १७०रु.

साहित्य प्रसार केंद्र नागपूर




माहितीपर

## सप्तसागरातील लंकेचा शोध



लंकेतील राम-रावण युद्धाची अभ्यासपूर्ण माहिती, नकाशे व रंगीत छायाचित्रांसह.

लेखक : डॉ. मधुसूदन चान्सरकर

किंमत : ७५रु.

साहित्य प्रसार केंद्र नागपूर

पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.

ललित

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके


## जंगलाचं देणं

ललित

मारुती चितमपल्ली यांचे वैशिष्ट्यपूर्ण शैलीतील निसर्ग लेख. (राज्य पुरस्कार प्राप्त)


लेखक : मारुती चितमपल्ली
सातवी आवृत्ती
**किंमत : १०० रु.**

साहित्य प्रसार केंद्र नागपूर




## अटलजींच्या काही कविता

काव्य




मा. पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या निवडक कवितांचा मराठी भावानुवाद डाव्या पानावर मूळ हिंदी कविता उजव्या पानावर मराठी अनुवाद

मराठी भानुवाद : ह. भी.चिकेरूर
**किंमत : ७५रु.**

साहित्य प्रसार केंद्र नागपूर


## प्रश्न पाण्याचा आपल्या सर्वांचा

माहितीपर

पिण्याच्या पाण्याची कमतरता, क्षारता, अनियमित पाऊस,वाढती मागणी व पूर यासारख्या विविध प्रश्नांवरील चर्चा, परंपरागत ज्ञानाचा उपयोग करून देशविदेशात यशस्वी झालेले प्रयोग

संपादक : एस. जी. गौतम
मराठी अनु : प्रणव वडनेरकर
**किंमत : १२५रु.**

साहित्य प्रसार केंद्र नागपूर





पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

## सप्तरंग

काव्य




कविवर्य सुरेश भट यांचा खास शैलीतील काव्यसंग्रह, आशा भोसले यांची प्रस्तावना

कवी : सुरेश भट
**किंमत : ८०रु.**

साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

## अवस्था

कादंबरी

सडलेल्या राजकीय; सामाजिक जीवनातूनही मानवी व्यक्तित्वाच्या वैभवाचं दर्शन घडवणारी चिंतनगर्भ कादंबरी


मूळ लेखक : यू. आर. अनंतमूर्ती
अनुवाद : उमा कुलकर्णी
**किंमत : ११० रुपये**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.




## वाचनातून विज्ञान

माहितीपर




कोणतीही घटना कशी घडली यामागची शास्त्रीय जिज्ञासा. काही अंशी शमवणारे पुस्तक

लेखक : डी. एस. इटोकर
**किंमत : १०० रुपये**

मेहता पब्लिशिंग हाऊस,


पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

## एक्झोडस्

कादंबरी

दोन हजार वर्षे जगाच्या नकाशावरून पुसल्या गेलेल्या आपल्या देशाची, इस्त्रायलची पुर्नस्थापना करणाऱ्या रणधुरंधर ज्यूंची कथा





मूळ लेखक : लिऑन युरिस
अनुवाद : बाळ भागवत
किंमत : ४४०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

मार्गदर्शनपर

## असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व




आपल्या मुलांचे व्यक्तिमत्त्व सर्वार्थाने फुलवण्यासाठी मानसशास्त्राच्या आधारे दिलेला मार्गदर्शक मूलमंत्र


लेखिका : डॉ. रमा मराठे
किंमत : १२०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस,

## बंजाऱ्याचे घर

ललित

जीवनारंभापासून मानवाला आधार देणाऱ्या 'घरा' बद्दलचे मनस्पर्शी लेखन.




लेखिका : यशोधरा भोसले
किंमत : १६० रुपये

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.


पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

मार्गदर्शनपर

## आपण आपले ताणतणाव - एक चिंतन




आपले ताण आणि आपले समाधान यांची सांगड कशी घालायची याचे डॉ. रिचर्ड कार्ल्सन यांच्या विचारांचा आधार घेऊन केलेले विवेचन

लेखिका : अंजनी नरवणे
किंमत : १०० रुपये


मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

## आमार मेयेबेला

आत्मकथन

तसलिमा नासरिन या संवेदनशील लेखिकेचे अस्वस्थ करणारे, चमत्कृतिपूर्ण लहानपण!


मूळ लेखिका : तसलिमा नासरिन
अनुवाद : मृणालिनी गडकरी
किंमत : २०० रुपये




मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

कथा

## रावीपार




गीतकार गुलजार यांच्या आशयसंपन्न कथांचा, सरस, सकस अनुवाद.

अनुवाद : विजय पाडळकर/मोहन वेल्हाळ
किंमत : १५० रुपये

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.

# पुस्तके मिळण्याची ठिकाणे

**नामवंतांनी सुचवलेली पुस्तके आपण खालील दुकानांमधून मिळवू शकता. किंवा त्याच्या प्रकाशन संस्थेकडेही मागणी करू शकता. हा अंक संग्रही ठेवा व निवडक पुस्तकांची मागणी अवश्य नोंदवा.**

## पुणे

**रसिक साहित्य,** अप्पा बळवंत चौक,पुणे ४११ ००२ फोन नं. ४४५११२९
**श्री लेखन वाचन भांडार,** १००४, बुधवार पेठ,पुणे ४११ ००२.फोन नं. ४४७४४७९
**पाटील इंटरप्रायझेस,** २७ बी, बुधवार पेठ,सिद्धार्थ चेंबर्स, अप्पा बळवंत चौक, पुणे
फोन नं. ४४८७६२९
**शुभम साहित्य,** ६६६, नारायण पेठ, महाराष्ट्र होजिअरीजवळ, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ००२. फोन नं. ४४७४३२२

## मुंबई

**आयडियल पुस्तक त्रिवेणी,** छबीलदास रोड,दादर मुंबई २८.फोन नं. २४३०४२५४
**मॅजेस्टिक एजन्सीज,** विष्णू निवास, टिळकपुलाजवळ,सेनापती बापट मार्ग,दादर, मुंबई २८. फोन नं. २४३०५९१४
**जवाहर बुक डेपो,** १९/बी, श्रद्धानंद रोड, विलेपार्ले (पू) मुंबई ५ फोन नं. २६१४८७३५

## नासिक

**राहुल बुक सेंटर,** नेहरू गार्डन,शॉपिंग सेंटर, नाशिक ४२२००१. फोन नं. २५९९६०
**ज्योती स्टोअर्स,** जीवनछाया,मुरकुटे कॉलनी,गंगापूर रोड नाशिक. फोन नं. २५०४०२६

## कोल्हापूर

**मेहता बुक सेलर्स,** ३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर. फोन नं. २५४२३०४

## नागपूर

**साहित्य प्रसार केंद्र,** नेहरू मार्ग, सीताबर्डी, नागपूर १२. फोन नं. २५२३७०२
**नागपूर पॉप्यूलर बुक स्टॉल,** पटवर्धन हायस्कूल समोर,सीताबर्डी, नागपूर १२. फोन नं. २५२४२७८



## नांदेड

**अभय पुस्तक भांडार,** भोरे कॉम्प्लेक्स,महावीर चौक,नांदेड ४३१६०१. फोन नं. २४०२६५

## औरंगाबाद

**विद्या बुक्स,** औरंगपुरा, औरंगाबाद ४३१००१. फोन नं. २३३७३७१

## लातूर

**भारतीय पुस्तकालय,** मेन रोड, लातूर ४१२५१२. फोन नं. २४८३८४
**गजानन बुक स्टॉल,** वडवळ नागनाथ,ता. चाकुर, लातूर. फोन नं. ५५८७१

## सांगली

**स्टुडण्टस बुक डेपो,** सराफबाझार सांगली ४१६ ४१६. फोन नं. २३७४२५०
**जी.आर.ताम्हणकर बुकसेलर्स,** सराफनाका,सांगली ४१६४१६.फोन नं. २३७३६०५
**रत्नाकर बुक स्टॉल,** हायस्कूल रोड,पोस्ट बॉक्स नं,१३, मिरज, ४१६४१० फोन नं. २२२५६४

## सोलापूर

**सरस्वती बुक डेपो,** नवी पेठ,सोलापूर ४१३००१. फोन नं. २६२६६३०
**कुंदूर बंधू पुस्तक भांडार,** ६३, नवी पेठ,सोलापूर ४१३ ००७ फोन नं. २६२६१५६

## अमरावती


**पॉप्यूलर बुक सेंटर,** झुनझुनवाला धर्मशाळाकॉटन मार्केट,अमरावती ४४४६०१ फोन नं. २५७३०८१

## अकोला

**मिहीर उद्योग केंद्र,** 'केशव अर्चना'गांधी चौक,अकोला ४४४००१.फोन नं. २४४२११३८

## प्रकाशने

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०, फोन नं. ४४७६९२४
**साहित्य प्रसार केंद्र,** नेहरू मार्ग, सीताबर्डी, नागपूर १२.फोन नं. २५२३७०२




## सुवर्णा नाईक निंबाळकर यांना पुणे विद्यापीठाची पीएच. डी.

सुवर्णा कृष्णराव नाईक निंबाळकर यांना पुणे विद्यापीठाने मराठी विषयातील पीएच.डी.जाहीर केली आहे. 'रणजित देसाई यांच्या कथेचा सामाजिक आणि वाङ्मयीन अभ्यास'हा प्रबंधाचा विषय होता. डॉ. कृष्णा किरवले यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

## गडाख यांना समाजगौरव पुरस्कार

नारायण मेघाजी लोखंडे प्रतिष्ठानतर्फे शेती व सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल श्री. गडाख यांना 'समाजवैभव' पुरस्काराने गौरविण्यात आले. पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या प्रसंगी माजी कामगार मंत्री हरिभाऊ नाईक यांना 'समर्पित कार्यकर्ता', तर पत्रकार सुधीर भोंगळे यांना 'दीनबंधू पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. प्रत्येकी पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. कॉंग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ. विजया पाटील यांना 'महिला प्रेरणा', तर कामगार नेते दिलीप जगताप (मुंबई) व युवराज रणवरे (पुणे) यांना 'समर्पित कार्यकर्ता' पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रत्येकी तीन हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

## 'संघर्ष सन्मान पुरस्काराचे वितरण

मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रातर्फे संस्थापिका डॉ. अनिता अवचट यांच्या स्मृतीनिमित्त अपंगांच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या श्रीमती अरुंधती खाडिलकर , व शेतीतज्ज्ञ भागवतराव धोंडे यांना अभिनेते सदाशिव अमरापूरकर यांच्या हस्ते 'संघर्ष सन्मान पुरस्कार' देण्यात आला. प्रत्येकी पाच हजार रुपये व मानचिन्ह असे याचे स्वरूप होते.

मुक्तांगण केंद्राच्या 'आनंदयात्री' या विशेषांकाचे प्रकाशन श्री. अमरापूरकर यांच्या हस्ते झाले. डॉ. अनिता अवचट यांच्या आठवणी सांगून अमरापूरकर म्हणाले, की काही माणसे थोड्या आयुष्यात खूप काही करतात, अशा मंडळींपैकी त्या होत्या. श्री. धोंडे म्हणाले, ''या पुरस्कारामुळे प्रचंड प्रेरणा मिळाली. यानंतरच्या काळातही नवीन संशोधन करण्यास बळ प्राप्त झाले.'' ''सर्वसामान्य माणसांनी अपंगांच्या समस्या समजावून घ्यायला हव्यात,'' असे अरुंधती खाडिलकर यांनी सांगितले. केंद्राचे विश्वस्त डॉ. आनंद नाडकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

## प्रा. शेषराव मोरे यांना प्रसादबन पुरस्कार

वैद्यकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या प्रसादबनमहाराज होटाळकर यांच्या स्मरणार्थ मराठी भाषेतील उत्कृष्ट साहित्यकृतींना वाङ्मय पुरस्कार देण्यात येतात. यंदाचा प्रसादबन पुरस्कार विचारवंत प्रा. शेषराव मोरे यांना जाहीर झाला आहे. रोख पाच हजार, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह



असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

याशिवाय 'सकाळ'च्या मुंबई आवृत्तीचे संपादक संजीव लाटकर यांच्या '...आणि विद्येच्या बैलाला' (कथासंग्रह), सेलूचे प्रा. विश्वास वसेकर यांच्या 'शरसंधान' (कवितासंग्रह) आणि अहमदपूरच्या प्रा. ललिता गादगे यांच्या 'नाळबंधाची कहाणी' (ललित) या साहित्यकृतींची प्रसादबन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. रोख एक हजार रुपये, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## 'मौलिक मराठी चित्रगीते'या पुस्तकाला पुरस्कार

४९ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण समारंभामध्ये 'मौलिक मराठी चित्रगीते', पुस्तकाचे लेखक गंगाधर महांबरे व दिलीपराज प्रकाशनचे राजीव बर्वे या दोघांना हा पुरस्कार दंण्यात आला. पंधरा हजार रुपये रोख व सुवर्णकमळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मराठी प्रकाशक व मराठी पुस्तकास हा पुरस्कार प्रथमच मिळत आहे.

## बागडे यांच्या 'गटुळं'ला 'नाथमाधव' पुरस्कार

कालिका प्रकाशन विश्वस्त मंडळातर्फे 'कादंबरीकार नाथमाधव साहित्य पुरस्कारा'साठी रवींद्र बागडे यांच्या 'गटुळं'या कादंबरीची व 'चरित्रकार पु. बा. कुलकर्णी' पुरस्कारासाठी गिरिजा कीर यांच्या 'माझ्या आयुष्याची गोष्ट' या आत्मचरित्राची निवड झाली आहे. १९९९-२००१ या कालावधीसाठीचे हे पुरस्कार आहेत.

'गटुळं'ही कादंबरी मेहता पब्लिशिंग हाऊसने व 'माझ्या आयुष्याची गोष्ट' हे चरित्र हरी नारायण आपटे सहकार्याधारित प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे.

## बलवंत पुरस्कार 'पीडीए'ला जाहीर

चिंतामणराव कोल्हटकर ट्रस्टचा 'बलवंत पुरस्कार' या वर्षी प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन या संस्थेला मराठी रंगभूमीवरील उत्कृष्ट कामगिरीबद्दल देण्यात आला.

दहा हजार रुपये, शाल व श्रीफल, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यासाठी रमेश वैशंपायन, गजानन मोरगावकर, आनंद कोल्हटकर आणि चित्तरंजन कोल्हटकर या समितीने एकमताने निवड केली.

## इंदिरा पूनावाला यांना सिंधी विकास परिषदेचे पारितोषिक

कवयित्री इंदिरा पूनावाला यांच्या 'इबादत' आणि लेखक हरिकिशन समतानी यांच्या 'दुनिया रंग रंगीली' या कथासंग्रहाला राष्ट्रीय सिंधी भाषा विकास परिषदेचे वीस हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे. श्रीमती पूनावाला यांचे हिंदी, उर्दू व मराठी भाषेतही साहित्य प्रकाशित झाले आहे. यापूर्वी त्यांना दिल्ली अ‍ॅकॅडमीचा पुरस्कार मिळाला आहे.

## रामभाऊ जोशी यांना परांजपे पत्रकारिता पुरस्कार

पुणे येथील ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी यांना २००२-२००३ चा महाड-पोलादपूर पत्रकार संघातर्फे देण्यात येणारा शि. म. परांजपे पत्रकारिता पुरस्कार पत्रकार मुझफ्फर हुसेन यांच्या हस्ते महाड येथे देण्यात आला.

पाच हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### डॉ. सुशीला पाटील यांना 'परमहंस' पुरस्कार

पुणे विद्यापीठातील संत नामदेव अध्यासनातर्फे दिला जाणारा 'परमहंस श्रीस्वामी स्वरूपानंद पुरस्कार अमरावतीच्या संतसाहित्याच्या अभ्यासक डॉ. सुशीला पाटील यांना त्यांच्या 'वेध परतत्त्वाचा' या ग्रंथासाठी ३१ जानेवारीला प्रदान करण्यात आला.

### प्रा. डॉ. गजमल माळी यांना पत्रकारिता पुरस्कार

''महात्मा फुले यांनी कोणत्याही विशिष्ट समाजाला विरोध केला नाही. मात्र त्यांच्या विचारसरणीबद्दल समाजात बरेच गैरसमज आहेत,'' असे मत प्राचार्य गजमल माळी यांनी व्यक्त केले. विशाल सह्याद्री ट्रस्टकडून दिला जाणारा पत्रकारिता पुरस्कार ट्रस्टचे संस्थापक अनंतराव पाटील यांच्या हस्ते माळी यांना देण्यात आला.

कृषितज्ज्ञ बुधाजीराव मुळीक अध्यक्षस्थानी होते. अकरा हजार रुपये, सन्मानचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

या वेळी ल. भा. कुरकुरे यांच्या 'कहाणी अर्थशास्त्राची' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. संस्थेचे चिटणीस ज्ञानेश्वर खैरे यांनी प्रास्ताविक केले.


दि रजिस्ट्रेशन ॲक्ट ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल) रुल्स १९५६
नियम क्र. ८ अन्वये निवेदन **फॉर्म ४**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०. |
| २) | प्रकाशन काल | : | मासिक |
| ३) | मुद्रक, प्रकाशक व संपादक | : | सुनील मेहता,१२१६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०. |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ४) | प्रकाशनाची मालकी | : | सुनील मेहता, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०. |

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की वर दिलेला तपशील माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे बरोबर आहे.

दि. १५.०३.२००३

सुनील मेहता
प्रकाशक





◆ मार्च २००३
◆ वर्ष तिसरे
◆ अंक तिसरा


# मेहता मराठी ग्रंथजगत


संपादक : सुनील मेहता

कार्यकारी संपादक : शंकर सारडा

संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस


*— अनुक्रमणिका —*


**संपादकीय** - २

**साहित्यवार्ता** ७

**पुस्तक परिचय**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया : अनु. वासंती फडके ३२

सुवर्णकण : वि. स. खांडेकर ३६

मानवगाथा: एक शोधनिबंध : गो. मे. दळवी ४०

**पुरस्कार** ५४



मांडणी-अक्षरजुळणी : ***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**



**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*